cmyk

## संपादकीय

### बिनविरोधाचा योगायोग केवळ अशक्य

चंदिगड महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपने आपल्या उमेदवाराविरुद्धच्या मतपत्रिकाच बाद करण्याचा प्रयोग दाखविला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेने तो फसला होता. कदाचित त्या प्रयोगातील चुकांपासून धडा घेत आता भाजपने सुधारित प्रयोग राबविण्याचे मनावर घेतल्याचे दिसते. त्यामुळे सुरत मतदारसंघातून भाजप उमेदवाराच्या बिनविरोध निवडीसाठी आता चक्क काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांच्या विरोधी उमेदवारांना निवडणूक रिंगणातून 'बाद' करून टाकण्याचा पॅटर्न भाजपने जन्माला घातला आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१७ | शनिवार दि.२७ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### सहायक पोलिस निरीक्षकांसह दोन कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक पदक

बीडः जिल्हा पोलिस दलातील एका सहायक पोलिस निरीक्षकांसह दोन कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक पदक जाहिर झाले आहे. १ मे रोजी पोलिस मुख्यालयावर त्यांना हे पदक वितरीत केले जाणार आहे. दंगल नियंत्रण पथकाचे प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे, वाहतूक शाखेचे विष्णू काकडे, दत्तात्रय दुधाळ यांचा यात समावेश आहे. महादेव ढाकण यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेण्यात आली आहे. याशिवाय विष्णू काकडे यांनी वाहतूक शाखेत उत्कृष्ट कार्य केलेले आहे. दुधाळ यांची नेमणूक जरी वाहतूक शाखेत आहे. परंतू मागील अनेक वर्षांपासून ते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे अंगरक्षक म्हणून कर्तव्य बजावत आहेत.

### मतदान न करता कुऱ्हाडीने फोडले ईव्हीएम मशीन

नांदेड । प्रतिनिधी

मतदान करण्यासाठी आलेल्या एका तरुणाने मतदान केंद्रात प्रवेश करताच ईव्हीएम मशीनसह व्हीव्हीपॅट व इतर साहित्याची कुऱ्हाडीने नासधूस केली. तरुणाच्या हातात कुऱ्हाड पाहून केंद्रावरील निवडणूक अधिकारी व इतर कर्मचारी आणि एजंट यांनी केंद्रातून बाहेर पळ काढला. त्यांनंतर पोलिसांनी सदर तरुणाला ताब्यात घेतले. ही घटना बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथे घडली.

नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी शुक्रवारी सकाळपासून मतदान प्रक्रिया सुरू झाली. जिल्ह्यात जवळपास सगळीकडे शांततेत मतदान होत असताना हदगाव, माहूर, किनवट, देगलूर आदी तालुक्यातील काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन बंद पडण्याचा प्रकारही ◀◀ पान २ वर

# राज्यातील १७ कारखान्यांवर कारवाई होणार!

## ३० एप्रिलपर्यंत थकित एफआरपी न दिल्यास कारखान्यांची जप्ती?

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक साखर कारखाने शेतकऱ्यांच्या उसाची ४४० कोटी रुपयांची थकबाकी अडवून ठेवल्याचे समोर आले आहे. यामुळे आता साखर आयुक्तालय या कारखान्यांवर कारवाई करण्याच्या विचारात आहे. ३० एप्रिलपर्यंत थकित एफआरपी न दिल्यास काही कारखान्यांवर जप्तीची कारवाई होण्याची शक्यता आहे. साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार आणि साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांनी याबाबत गंभीर दखल घेतली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना उसाची एफआरपी देण्यात टाळाटाळ करणाऱ्या राज्यातील १७ साखर कारखान्यांना आयुक्तांनी काही दिवसांची मुदत दिली आहे.**



एफआरपी वेळेवर देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई केली जाणार नाही. मात्र, हेतूने एफआरपी अडवणाऱ्या कारखान्यांना महसूल वसुली प्रमाणपत्र (आरआरसी) बजावलेच ◀◀ पान २ वर

### १४ दिवसांची मुदत

शेतकऱ्यांकडून खासगी किंवा सहकारी साखर कारखान्याने ऊस खरेदी करताच पेमेंट देण्यासाठी १४ दिवसांची मुदत असते. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मुदतीत 'एफआरपी'ची रक्कम जमा करण्याचे बंधन कायद्याने साखर कारखान्यांवर टाकलेले आहे. त्यानंतरही पेमेंट न दिल्यास अशा कारखान्यांना तत्काळ नोटिसा बजावण्याचे अधिकार साखर आयुक्तालयाला आहेत. अर्थात, शेतकऱ्यांशी वैयक्तिक लेखी करार केल्यास दोन आठवड्यांच्या आत एफआरपी न दिल्यास कारखान्यांवर कारवाई न करण्याची तरतूद आहे. त्याचा लाभ राज्यातील खासगी कारखान्यांना मिळतो.

# बजरंग सोनवणेंना मोठा धक्का; जरांगे पाटलांचे वंचितला समाजबळ!

## छत्रपतींसह प्रकाश आंबेडकरांना मदत करा–मनोज जरांगे पाटील

अंबड । प्रतिनिधी

**बीड लोकसभेच्या निवडणुकीला वेगळे वळण आले असून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासाठी मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे वंचित बहुजन आघाडीला समाजबळ मिळणार असून छत्रपतींसह प्रकाश आंबेडकर यांना मदत करण्याचे मराठा समाजाला जरांगे पाटील यांनी आवाहन केले आहे. त्यामुळे बजरंग सोनवणे यांचे धाबे दणाणले असून आता पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यात सरसरळ लढत होईल असे वाटत असताना वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी मराठा समाजाच्या बळावर जोरदार मुसंडी मारली असल्याचे दिसत आहे.**






मनोज जरांगे पाटील यांची मराठवाड्याच्या संवाद दौऱ्यादरम्यान धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे तब्येत बिघडली होती. त्यांच्यावर गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी सुपर स्पेशलिटी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, शुक्रवारी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान असल्याने ते रुग्णवाहिकेतून उपचार घेत मतदानासाठी गोरी गंधारी येथे आले. आपला मतदानाचा हक्क बजावून ◀◀ पान २ वर

### लोकसभेच्या २८८ जागा लढवणार

लोकसभा निवडणूक मध्ये सगळे सोयरे व मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या उमेदवाराला असे पाडा की त्याच्या पाच पिढ्या पुन्हा निवडणुकीला उभा राहिला पाहिजे, असे आवाहन करून येणाऱ्या विधानसभेला संपूर्ण २८८ जागा लढविणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली.

### जरांगे पाटील नेमकं काय म्हणाले?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज प्रकाश आंबेडकर यांना सहकार्य करावे. त्याचबरोबर छत्रपतींच्या दोनही राज घराण्यांचा समाजाने सन्मान केला पाहिजे. हे माझे वैयक्तिक मत असल्याचे जरांगे यावेळी म्हणाले. तसेच माझा फोटो किंवा आंदोलनाचा फोटो कोणत्याही उमेदवाराने वापरु नये, असे ते म्हणाले.

### अशोक हिंगे धक्कादायक निकाल लावणारे उमेदवार

वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे हे आतापर्यंत मुख्य लढतीत नसल्याचे म्हटले जात होते. मात्र जरांगे पाटलांनी आंबेडकरांना पाठबळ देण्याचे आवाहन केल्याने बीड लोकसभेत अशोक हिंगे आता मुख्य लढतीत आले आहेत. खऱ्या अर्थाने ते धक्कादायक निकाल लावणारे उमेदवार म्हणून पुढे येण्याची शक्यता आहे.

### छाननीत १९ बाद तर ५५ उमेदवार वैध

बीड: लोकसभा मतदारसंघात आज छाननी चा दिवस असून ५५ उमेदवार वैध घोषित झालेली आहेत तर छाननी अंती १९ उमेदवार बाद ठरली आहेत. १८ ते २५ एप्रिल सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन अर्ज वाटपाची तसेच सादर करण्याची वेळ होती. या कालावधी दरम्यान एकूण ७४ उमेदवारांनी ९९ अर्ज दाखल केले होते. आज छाननी अंती १९ उमेदवार बाद ठरले असून ५५ उमेदवार वैध नामनिर्दिष्ट उमेदवारांची नावे खालील प्रमाणे आहेत. पंकजा गोपीनाथ मुंडे, भारतीय जनता पक्ष, बजरंग मनोहर सोनवणे, नॅशनॅलिस्ट काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, सिद्धार्थ राजेंद्र टाकणकर, बहुजन समाज पक्ष, अशोक भागोजी थोरात, बहुजन महापार्टी, अशोक सुखदेव हिंगे, वंचित बहुजन आघाडी, अंकुश रामा खोटे, भारतीय जवान किसान पार्टी, करुणा मुंडे, स्वराज्य शक्ती सेना, चंद्रकांत कुमार हजारे, महाराष्ट्र ◀◀ पान २ वर

# डॉ.प्रितमताई मुंडे यांचा खासदार फंड पुर्ण खर्चिक

## १७ कोटी रूपयातून जिल्ह्यात झाली विविध विकास कामे

बीड । प्रतिनिधी

**१७ व्या लोकसभे अंतर्गत २०१९ ते २०२४ या पाच वर्षांच्या काळात राज्यातील लोकसभा सदस्यांसाठी एकूण १७ कोटी रुपयांचा स्थानिक विकास निधी केंद्र सरकारतर्फे देण्यात आला.तो संपुर्ण निधी खर्च झाला असुन कुठलाच निधी परत गेला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.**



स्थानिक विकास निधीच्या निकषानुसार हा निधी टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात आला, पहिल्या टप्प्यात ०५ कोटी आणि नंतर १२ कोटी असे एकूण १७ कोटी निधी खा. प्रितमताई मुंडे यांना बीड लोकसभा क्षेत्रासाठी मिळाला.

वर्ष २०१९-२० साली १६६ विकास कामे , वर्ष २०२०-२१ : कोविड महामारीमुळे निधी उपलब्ध झाला नाही. , वर्ष २०२२-२३ साली ६५ विकास कामे , वर्ष २०२३-२४ साली १०९ विकास कामे , असे एकूण ३४० विकास कामे खा. प्रितमताई ◀◀ पान २ वर

# धक्कादायक! ठाण्यात सापडल्या ईव्हीएम मशीन

## हजारो मतदान कार्डही आढळले, घोटाळ्याचा संशय?




प्रातिनिधिक चित्र

ठाणे । वृत्तसंस्था

**लोकसभा निवडणुकीदरम्यान ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडिअमच्या जिन्याखाली चक्क ईव्हीएम आणि हजारो मतदानकार्ड सापडले सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. यावर घोटाळ्याचा संशय असल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.**

ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये निवडणूक साहित्य म्हणजे ईव्हीएम आणि हजारो मतदानकार्ड आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. एका वृत्तपत्रात आलेल्या बातमीनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी याबबातचा व्हिडिओ ट्विट केला. ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियममधील रिकाम्या खोल्यांमध्ये या वस्तू निवडणूक आयोगाकडून ठेवण्यात ◀◀ पान २ वर

### जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडिअममध्ये जिण्याखालील एक खोलीत ईव्हीएम मशीन सापडल्या. मतदानासाठी जितक्या मशीन वापरल्या जातात, मतदान संपल्यानंतर त्या मशीनची मोजदाद करुन निवडणुक अधिकाऱ्याच्या हातात सोपवाव्या लागतात. मग ठाण्यात सापडलेल्या ईव्हीएम मशीन आल्या कुठून, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. ईव्हीएमचा घोटाळा होत, ईव्हीएम बदलले जातात ही मनात साशंकता असल्याचेही ते म्हणाले.

# सुप्रीम कोर्टाकडून बॅलट पेपरला नकार



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**देशात लोकसभा निवडणूका ७ टप्प्यात होत आहेत. आतापर्यंत देशात चार टप्प्यात किंवा फार तर दोन टप्प्यात निवडणूका पार पाडल्या जात होत्या. मात्र यंदा पहिल्यांदाज देशातील लोकसभा निवडणूका सात टप्प्यात पार पडत आहेत. यापार्श्वभूमीवर ईव्हीएम मशिन्सच्या वापराबाबत अॅड.प्रशांत भूषण यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्त्यांनी संशय व्यक्त करत ईव्हीएम मशिन्सऐवजी लोकसभा निवडणूकीत बॅलेट पेपरचा वापर करावा अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर शुक्रवारी २६ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रणाली कायम ठेवत आणि बॅलेट पेपरचा वापर करण्याची विनंती फेटाळून लावली. त्याचबरोबर एखाद्या घटनात्मक संस्था किंवा प्रणालीवर ''आंधळा अविश्वास'' अवास्तव संशय निर्माण करतो आणि प्रगतीमध्ये अडथळा आणतो असा निरिक्षणही यावेळी नोंदविले.**

न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याशी सुसंगत निकाल देताना, मतदारांना व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल युनिट्सच्या पेपर स्लिप्स देण्याच्या याचिकाकर्त्यांच्या ◀◀ पान २ वर

# राजकारणात जाती–पातीचे उगवलेले तण काढून फेकून द्या–पंकजाताई मुंडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडे कोणताही अजेंडा नाही, त्यामुळेच ते जातीपातीचे राजकारण पुढे करत जनतेमध्ये बुद्धिभेद करण्याचे काम करत आहेत. भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन आपल्या विकासाचं व्हीजन मतदारांपर्यंत जाऊन सांगावं. तुमचं मला मिळालेलं प्रत्येक मत हे जिल्हयाच्या विकासाला जाणार आहे, त्यामुळे ही संधी वाया घालू नका. पुढील पाच वर्षे सेवा करण्यासाठी आशीर्वाद द्या असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.



पंकजाताई मुंडे यांनी आज मतदारसंघातील घाटनांदुर, पट्टीवडगांव, बर्दापूर, राडी सर्कलमधील गावांचा झंझावती दौरा करून मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतल्या तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांशी देखील संवाद साधला त्यावेळी त्या ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २५.५० क्विंटल | २,२९१ | ३,२०१ | २,६९० |
| ज्वारी/हायब्रिड : ८६.५० क्विंटल | १,७५० | ३,००१ | २,४६५ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २४.५० क्विंटल | ९,३२१ | १०,६९१ | १०,२९३ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: २३.०० क्विंटल | १,५०० | २,६५१ | २,३१५ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,५६० | ४,५६० | ४,५६० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,६५० | ६,९३६ | ५,८८१ |

# पंतप्रधान मोदींवर ६ वर्षांसाठी निवडणूक बंदी घालण्याची मागणी

## याचिका दाखल, दिल्ली उच्च न्यायालयात २९ एप्रिलला सुनावणी



नवी दिल्ली । प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर ६ वर्षांसाठी निवडणूक बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. यावर दिल्ली उच्च न्यायालयात २९ एप्रिलला सुनावणी होणार आहे. आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप करत पंतप्रधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात उच्च न्यायालयात १५ एप्रिल रोजी याचिका दाखल केली होती.**

पंतप्रधान मोदी यांच्याविरोधात वकील आनंद एस. जोंधळे यांनी ही याचिका दाखल केली आहे. ''पंतप्रधान नरेंद्र मोदी देव आणि मंदिरांच्या नावावर लोकांकडून मते मागत आहेत. पंतप्रधानांनी ९ एप्रिल रोजी उत्तर प्रदेशच्या पिलीभीतमध्ये केलेल्या भाषणात हिंदू देव-देवता, शीख देवता आणि त्यांच्या प्रार्थनास्थळांच्या नावाने मते मागितली. पंतप्रधान मोदींनी राम मंदिर बांधले, असे सांगितले. करतारपूर साहिब कॉरिडॉर विकसीत झाला असेही पंतप्रधानांनी सांगितले,'' असे आनंद एस. जोंधळे यांनी या याचिकेमध्ये म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या याच वक्तव्यांची ◀◀ पान २ वर

### पिलीभीतमध्ये पंतप्रधान मोदी काय म्हणाले होते?

५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अयोध्येत भव्य राम मंदिर बांधले गेले. इंडिया आघाडीचे लोक राम मंदिराच्या उभारणीपूर्वीही द्वेष करत होते आणि आजही द्वेष करतात. मंदिर बांधू नये यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. आज ज्या काँग्रेससोबत समाजवादी पक्ष उभा आहे, त्यांनी १९८४ मध्ये आमच्या शीख बंधू-भगिनींचे काय केले ते कोणीही विसरू शकत नाही. हा भाजप आहे, जो शिखांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभा आहे. भाजपने लंगरच्या वस्तूंवरील जीएसटी हटवला, असे वक्तव्य पंतप्रधानांनी पिलीभीतच्या प्रचार सभेत केले होते.

cmyk

## अग्रलेख

# बिनविरोधाचा योगायोग केवळ अशक्य

चंदिगड महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपने आपल्या उमेदवाराविरुद्धच्या मतपत्रिकाच बाद करण्याचा प्रयोग दाखविला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेने तो फसला होता. कदाचित त्या प्रयोगातील चुकांपासून धडा घेत आता भाजपने सुधारित प्रयोग राबविण्याचे मनावर घेतल्याचे दिसते. त्यामुळे सुरत मतदारसंघातून भाजप उमेदवाराच्या बिनविरोध निवडीसाठी आता चक्क काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांच्या विरोधी उमेदवारांना निवडणूक रिंगणातून 'बाद' करून टाकण्याचा पॅटर्न भाजपने जन्माला घातला आहे.

खरे तर एखादा उमेदवार बिनविरोध निवडून आला तर त्याचे स्वागतच व्हायला पाहिजे. त्यातून त्या उमेदवाराचे मोठेपण व कार्यकर्तृत्व सिद्ध होते. देशात आजवर २८ खासदार व २९८ आमदार निवडणुकीत बिनविरोध निवडून गेले आहेत व त्याचे स्वागतही देशातील जनतेने केले आहे. चिनी आक्रमणानंतर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात समाविष्ट झालेल्या यशवंतराव चव्हाण यांनाही नाशिक मतदारसंघातून महाराष्ट्राने बिनविरोध निवडून दिले होते. मात्र, सुरतचा बिनविरोध निवडीचा पॅटर्न हा निराळाच आहे. म्हणजे कागदोपत्री यात कुठलीही खोट नाही. मात्र, हा उमेदवार बिनविरोध निवडला जाताना जे अगम्य योगायोग एकाच वेळी घडले ते मात्र या पॅटर्नची 'बदसूरती' अधोरेखित करणारे आहेत आणि म्हणूनच त्यावर आता वाद रंगला आहे. अर्थात हा वाद राजकीय असल्याने त्यात आरोप-प्रत्यारोप व एकमेकांवर चिखलफेक हे सध्याच्या राजकीय शिरस्त्याप्रमाणे साहजिकच. त्यातून काही हाती लागणे अशक्यच, त्यामुळे हे वाद चिवडण्यात लोकशाही व्यवस्थेवर नितांत श्रद्धा ठेवणाऱ्या मतदारांना काही स्वारस्य असण्याचे कारण नाहीच. मात्र, हे अघटित घडले कसे? हे समजावून घेण्यासाठी या सगळ्या घटनेचा बारकाईने अभ्यास करणे व त्यासाठी ही घटना सविस्तर समजून घेणे आवश्यक ठरते. सुरत लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार निलेश कुंभानी यांच्या अर्जावर ज्या चार सूचक, अनुमोदकांची नावे होती त्यापैकी तिघांना ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर हजर करू शकले नाहीत. या तिघांच्या सह्या बनावट असल्याचा आक्षेप विरोधी उमेदवार म्हणजे भाजपचे मुकेश दलाल यांनी घेतला होता. त्यामुळे नियमाप्रमाणे निलेश कुंभानी यांनी आपल्या अनुमोदक व सूचकांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर हजर करून आक्षेप असत्य असल्याचे सिद्ध करायला हवे होते पण ते हे करू शकले नाहीत म्हणून त्यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला. भाजपने आपल्या अनुमोदक व सूचकांना फितुर केल्याचा आरोप कुंभानी यांनी केला आहे. तो सत्यही मानला तरी अर्ज बाद झाल्यावर काँग्रेसचा उमेदवारच रहस्यमयरीत्या गायब होणे, त्यांच्या चारही अनुमोदकांनी अर्जावरील स्वाक्षरी आपली असल्याचे नाकारणे अशा वेगवान घडामोडी घडल्या. बरं ज्यांच्यावर काँग्रेस उमेदवाराने फितूर झाल्याचा आरोप केला ते तिघे कोण तर पहिला काँग्रेस उमेदवाराचा मेव्हणा, दुसरा त्यांचा पुतण्या आणि तिसरा त्यांचा व्यवसायातील भागीदार. एवढ्यावर हे नाट्य संपत नाही. पर्यायी उमेदवार म्हणून अर्ज भरणाऱ्या दुसऱ्या काँग्रेस उमेदवाराचा अर्ज अगोदरच बाद होतो व हा निर्णय येण्यापूर्वी हा पर्यायी उमेदवार 'नॉट रिचेबल' झालेला असतो. काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यावर खरे तर उर्वरित पक्षांच्या उमेदवारांना आपल्याला संधी मिळाल्याचे स्फुरण चढायला हवे. मात्र, घडले उलटेच. बहुजन समाज पक्षाचा उमेदवार मागच्या दाराने गुपचूप जिल्हाधिकारी कार्यालयात येतो व अर्ज माघारी घेऊन मागच्याच दाराने गुपचूप निघून जातो. बहुधा बसपच्या उमेदवाराची प्रेरणा मिळाल्याने उर्वरित चार अपक्ष उमेदवारही आपले उमेदवारी अर्ज मागे घेऊन टाकतात आणि मग निवडणूक रिंगणात एकटाच उरल्याने भाजपचा उमेदवार बिनविरोध निवडला गेल्याचे जाहीर होते. बिनविरोध निवडून आलेला हा उमेदवार मोदींच्या चरणी आपण 'पहिले कमळ'अर्पण केल्याची प्रतिक्रिया देतो. आता एवढे सगळे नाट्यमय योगायोग एकाच वेळी घडले. हे सगळे घडवले गेल्याचा आरोप होणारच व तो चुकीचाही नाही. मात्र, हा खेळ दडपशाहीने रंगविला गेला की सर्वसंमतीने हा प्रश्न घटनेनंतर उत्तरार्धात घडलेल्या घडामोडींनी निर्माण होतो. त्याचे उत्तर मात्र देशातील जनतेला या गदारोळात मिळत नाही. अर्ज माघारीच्या दिवशी आठ उमेदवारांनी घेतलेली माघार हा लोकशाहीतील अफलातून योगायोग नाही काय? त्यामुळे सर्व गोष्टी लोकशाही प्रक्रियेनुसार झाल्याच्या भाजपच्या दाव्यावर कोण विश्वास ठेवेल? काँग्रेसचे उमेदवार भाजपवर आरोप करतात. मात्र, त्या आरोपांची तड लावून भाजपचा खेळ जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न करण्याऐवजी रहस्यमरीत्या गायब होतात. मग हा प्रकार राज्यघटनेसमोरील संकट आहे हा विरोधकांचा आरोप पूर्णपणे सत्य असला तरी या संकटास कोण-कोण जबाबदार हा संशय मतदारांच्या मनात निर्माण होणे साहजिकच. भाजप जर घडले ते प्रक्रियेप्रमाणेच असा दावा करत असेल तर मग मतदारांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांचे उत्तर देणे, शंका-कुशंकांचे निराकरण करण्यासाठी या घटनाक्रमाची तड लावून सत्य जनतेसमोर ठेवणे सत्ताधारी म्हणून भाजपचे कर्तव्यच. मात्र हे कर्तव्य भाजप पार पाडणार का? हा प्रश्नच आहे, त्यामुळे विरोधकांचे आरोप बिनबुडाचे नक्कीच ठरवता येणार नाहीत. या सगळ्या बाबीकडे मतदार नक्कीच संशयाने पाहत आहेत हे नक्की. त्याचा लोकसभा निवडणूक निकालांवर काय परिणाम दिसेल याची चार जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल.

# शिवसेनेला भाजपपासून बाजूला करण्यासाठी झालेल्या बैठकांचे मी व्हिडीओ देतो

## पुरंदरमध्ये धनंजय मुंडे यांची तोफ धडाडली; तुमचे ते संस्कार अन् दादांची ती गद्दारी!

**पुणे । प्रतिनिधी**

**दिल्लीला कुणाच्या घरी शिवसेनेला बाजूला कसे काढायचे याच्या बैठका झाल्या. हे त्यांनी केले. ते संस्कार दादांनी केले तर गद्दारी, असा हल्लाबोलच धनंजय मुंडे यांनी केला. पुरंदर येथील प्रचार सभेत ते बोलत होते.**

२०१७ ला गणेश चतुर्थीच्या दिवशी कुठे? कशी? बैठक झाली, दिल्लीला कुणाच्या घरी शिवसेनेला बाजूला कसे काढायचे याच्या बैठका झाल्या हे व्हिडिओसहीत मी देऊ शकतो, असे वक्तव्य करत धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्याबाबत मोठा गौप्यस्फोट केल्याचे पाहायला मिळाले. पुरंदरला धनंजय मुंडे आले असता त्यांनी हा जाहीरपणे मोठा गौप्यस्फोट केला. दिल्लीला कुणाच्या घरी शिवसेनेला बाजूला कसे काढायचे याच्या बैठका झाल्या. हे त्यांनी केले. ते संस्कार दादांनी केले तर गद्दारी, असा हल्लाबोलच धनंजय मुंडे यांनी केला. ते पुढे असेही म्हणाले, 'ते सांगतायत शिवसेनेला आम्ही भाजपपासून लांब केले. ती आमची चाल होती आणि उद्धव ठाकरे हसतायत. किती ही हतबलता. त्यावेळी राष्ट्रवादीच्या ५३ पैकी ५३ आमदारांनी भाजपला समर्थन दिले होते. त्यांनी कागदावर सह्या केल्या होत्या. दादा हा कागद तुम्हाला दाखवतील की नाही माहीत नाही. पण कधी तरी मी तो कागद दाखवणार आहे', असे धनंजय मुंडे म्हणाले.

# महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात ५३.५१ टक्के मतदान

**पुणे। प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील आठ जागांवर सायंकाळी ६ वाजता मतदान संपले. या आठ जागांवर निवडणूक लढवणाऱ्या एकूण २०४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. ४ जूनला निकाल लागणार आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील महाराष्ट्रातील आठ मतदारसंघात ५३.५१ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. तर देशातील १३ राज्यांमध्ये मतदान झाले.

**महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी**

वर्धा - ५६.६६ टक्के, अकोला -५२.४९ टक्के, अमरावती - ५४.५० टक्के, बुलढाणा - ५२.२४ टक्के, हिंगोली - ५२.०३ टक्के, नांदेड - ५२.४७ टक्के, परभणी -५३.७९ टक्के, यवतमाळ - वाशिम -५४.०४ टक्के.



# बंदी असलेल्या गुटख्याची माजलगावात सर्रास विक्री

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुका हा अवैध गुटखा विक्रीचा जणू अड्डा बनला आहे की काय? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. कारण तालुक्यात व शहरात ठिकठिकाणी असलेल्या पानटपरीवर सर्रास गुटखा विक्री होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.तर पोलीस बघ्याची भुमिका घेत असल्याचे दिसत असून अन्नभेसळ शहरातील गुटखा माफीयांना रान मोकळे सोडत असल्याचे दिसते.**

तालुक्यात व शहरात सध्या राज्य सरकारने बंदी घातलेल्या गुटखा विक्रीने थैमान घातले आहे. राजरोसपणे शहरातील प्रत्येक पानटपरीवर बिनदिक्कत गुटखा विकला जात असून तो त्या पानटपरीवाल्यांना देखील सहजरित्या उपलब्ध होत असल्याने पोलीस प्रशासन व अन्न आणि औषध प्रशासन निव्वळ बघ्याच्या भूमिकेत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. शहरात तर अवैध गुटखा विक्री व पुरवठा मोठ्या प्रमाणात चालू असून शहरात असणाऱ्या प्रत्येक पानटपरीवर विविध कंपन्यांचा गुटखा जो की महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला आहे तो सहज मिळत आहे. बंद असलेला गुटखा पानटपरीवर लपून देखील ठेवला जात नाही. तो सहजरित्या काढून दिला जात असल्याचा प्रकार शहरात पाहावयास मिळत आहे. शहरात प्रामुख्याने बसस्थानक परिसर, पोलीस ठाणे परिसर, मोंढा परिसर, नगरपालिका परिसरात गुटखा विक्रेत्यांनी धुमाकूळ घातला आहे. हा व्यवसाय पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून केला जात आहे. . याचे मुख्य कारण काय असावे याचा उलगडा अद्याप देखील झाला नसून मोठ्या प्रमाणा अवैध गुटखा विक्री तडजोडीतून होत असल्याचे देखील बोलले जात आहे. हीच परिस्थिती ग्रामीण भागात देखील असून तालुक्यातील प्रत्येक गावाच्या बसथांब्यावर व गावागावातील छोट्या मोठ्या किराणा दुकानावर देखील अवैध गुटखा विक्रीचे लोन पसरले आहे. यामुळे फार मोठ्या प्रमाणात आरोग्य धोक्यात आले असल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच सहजरित्या गुटखा उपलब्धतेमुळे जास्त प्रमाणात किशोरवयीन मुले या गुटख्याच्या आहारी जात असल्याचे विदारक चित्र दिसून आहे. युवापिढी गुटख्याच्या व्यसनाने बरबाद होत असताना देखील या सर्व प्रकाराकडे अन्न आणि औषध प्रशासन व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत शहरासह तालुक्यात या गुटखा माफीयांना रान मोकळ सोडल्याचे दिसते.

# समाजाची एकजूट होणे ही काळाची गरज -अ‍ॅड.रामचंद्र मेंदाडकर

## 'महादेव कोळी संघर्ष समिती' जनजागृती मेळावा ठाणे येथे संपन्न

**ठाणे । वृत्तसंस्था**

**'कोळी महादेव' या अनुसूचित जमातीचे दावे स्वातंत्र्य पूर्व काळातील नोंदी 'कोळी' आढळून येत असल्याने सरसकट 'अनुसूचित जमातीचे' प्रमाणपत्र अवैध केली जात आहेत. त्यामुळे अनेकांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे तर हजारोंना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात येते म्हणून हा प्रश्न गांभीर्याने सोडवायचा असेल तर समाजाची एकजूट होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अ‍ॅड. रामचंद्र मेंदाडकर यांनी केले.**

महादेव कोळी संघर्ष समिती '' जनजागृती मेळावा नुकताच माणिक हॉल, ठाणे (पूर्व) येथे संपन्न झाला. या सभेचे अध्यक्षस्थान प्रमोद नाखवा यांनी भूषविले होते. रामचंद्र मेंदाडकर म्हणाले की, मानववंशशास्त्राचा अभ्यास करता प्राचीन काळापासून कोळी ही जात नसून जमात आहे तसे सिद्ध करणारे १८४४ पासून ते डॉ. गोविंद गारे यांच्या 'सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी' इत्यादी संशोधन ग्रंथातून सिद्ध होते. असे त्यांनी नमूद केले. शिवाय १९२४ नुसार कोळी ही गुन्हेगारी प्रवृत्तीची जमात आहे असे असल्याने केवळ स्वार्थी लोकांपोटी कोळी महादेव, डोंगर कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी इत्यादी जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केलेला आहे. जमातीवर आलेले संकट हे दूर करायचे असेल तर भारतीय पुरावा अधिनियमाच्या कलम ५७ अन्वये १८४४ पासूनचे सर्व संदर्भ ग्रंथ शासनाकडे सादर करून, कोळी जमातीला अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी एक शासन ठराव समिती गठित करून त्यांच्या मार्फत परिपूर्ण अभ्यास करून अनुसूचित जमात मागास आयोगाकडे तशी शिफारस करण्यासाठी समाजाने प्रयत्न करावेत असे आवाहन मेंदाडकर यांनी केले. या प्रसंगी महादेव कोळी संघर्ष समितीची कार्यकारिणी नवीन निवड करण्यात आली. यामध्ये विष्णु पाटील अध्यक्ष, शिरीष राजके उपाध्यक्ष, यामिनी बस्ताव सरचिटणीस, संपदा मिलिंद पाटील चिटणीस, ज्योती इडेकर खजिनदार, प्रणाली प्रशांत कोळी सह-खजिनदार यांची निवड करण्यात आली तर सदस्य म्हणून सिद्धांत सवई, अशोक पाटील, राजेश भोईर, प्रतिज्ञा इडेकर, विलास बस्ताव यांची निवड करण्यात आली. सदर मेळावा यशस्वी होण्यासाठी प्रणाली कोळी, संपदा पाटील, सुरेन कोळी, अजय कोळी, रोहित तरे, प्रकाश कोळी, प्रशांत कोळी, अर्जुन मेस्त्री, चंद्रोदय वाघमारे, हेमंत कोळी, स्मिता भोईर, रेखा पाटील यांनी परिश्रम घेतले. यावेळी सव सहकार्यांचे आयोजकांवतीने जाहीर आभार मानण्यात आले.

# पान १वरून...

### उसाची थकबाकी अडवणाऱ्या

पाहिजे, अशी भूमिका आयुक्तांनी घेतली आहे. यापूर्वीच सोलापूरच्या विठ्ठल कॉर्पोरेशन या खासगी साखर कारखान्यावर आरआरसी कारवाई करण्यात आली आहे. यानंतर आता इतर कारखान्यांचाही आढावा घेतला जात आहे. एप्रिल अखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात थकित रकमा जमा करण्याबाबत आयुक्तालयाने यापूर्वीच कारखान्यांना बजावले आहे. त्यामुळे मेच्या पहिल्या आठवड्यात आयुक्तांकडून एफआरपी वाटपाचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर काही साखर कारखान्यांना 'आरआरसी' बजावली जाईल. 'आरआरसी' बजावताच जिल्हाधिकाऱ्यांच्या यंत्रणेला संबंधित कारखान्यावर जप्तीची कारवाई करून शेतकऱ्यांच्या थकित रकमा देण्याचे अधिकार मिळतात.

--------------

### बजरंग सोनवणेंना मोठा धक्का;

ते परत पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. छत्रपतींसह प्रकाश आंबेडकर यांना मदत करण्याचे मराठा समाजाला मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी आवाहन केले. त्यामुळे बीड लोकसभेच्या निवडणुकीत आता वेगळा रंग भरला आहे. वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनाच मनोज जरांगे यांनी अप्रत्यक्ष पाठींबा दिल्याचे त्यांच्या विधानावरुन दिसते. त्यामुळे हा बजरंग सोनवणे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आंबेडकरांना साथ देण्याचे ठरवल्याने त्याचा थेट फायदा अशोक हिंगे यांना होणार असून मराठा समाजाची जी मते बजरंग सोनवणे यांना मिळणार होती, ती आता अशोक हिंगे यांना मिळतील, असेही म्हटले जात आहे. तसेच यावेळी जरांगे पाटील म्हणाले, सगे सोयरेच्या अंमलबजावणीच्या बाजूने समाजाने मतदान करावे, असे म्हणाले.

--------

### मतदान न करता कुऱ्हाडीन

उघडकीस आला. दरम्यान, बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथील वार्ड क्रमांक ३ मध्ये मतदान असलेल्या भैय्यासाहेब आनंदराव एडके या तरुणाने मतदानासाठी मतदान केंद्रात प्रवेश केला. तद्नंतर सोबत आणलेली कुऱ्हाड काढून मतदान यंत्र फोडली. तरुणाच्या हातातील कुऱ्हाड पाहून भयभीत झालेल्या कर्मचाऱ्यांनी आणि मतदान प्रतिनिधींनी केंद्राबाहेर पळ काढला. वेळीच पोलिसांनी आरोपी भैय्यासाहेब एडके यास ताब्यात घेतले.

**बेरोजगारीमुळे केले कृत्य**

आपण एम.ए.चे शिक्षण घेवून देखील बेरोजगार असून या सरकारमुळेच बेरोजगारी निर्माण झाल्याचा राग मनात धरून आपण हे कृत्य केल्याचे सदर आरोपी भैय्यासाहेब एडके याने पोलिसांना सांगितले.

सदर घटना दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. तोपर्यंत एकूण ३७९ मतदानापैकी १८५ मतदारांनी या केंद्रावर मतदानाचा हक्क बजावल्याचे निवडणूक अधिकारी सुबोध थोरात यांनी सांगितले.

-----------

### धक्कादायक! ठाण्यात सापडल्या

आल्या होत्या. अचानक आठवण आल्यानंतर निवडणूक अधिकाऱ्याने तलाठी, पोलीस, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ही खोली उघडण्याचा प्रयत्न केला. या बंद खोलीमध्ये बंद लिफाफे, मतदान ओळखपत्र आणि ईव्हीएम मशीन सापडले. त्यानंतर या सर्व वस्तू भंगारात विकण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. मात्र हा प्रकार काय आहे? हे अद्याप समजू शकले नाही.

---------

### डॉ.प्रितमताई मुंडे यांचा

मुंडे यांनी खासदार निधी अंतर्गत प्रशासनाला सुचविली, त्यापैकी एकूण ३१५ विकास कामांना प्रशासनाची मंजुरी मिळाली आणि सध्या ही विकास कामे प्रगतीपथावर आहेत, तर काही कामे पूर्ण झाली आहेत. प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ३१५ विकास कामांवर पाच वर्षांच्या काळात मिळालेल्या एकूण १७ कोटी पैकी १६ कोटी ७८ लक्ष रुपयांचा निधी खर्च झाला असून सर्व निधी सदरील विकास कामांकरिता वर्ग करण्यात आला आहे. तर उर्वरित निधी हा जिल्हा नियोजन विभाग एकूण निधीच्या ०२ % आकस्मित निधी' म्हणून आरक्षित ठेवतो. एकंदरीत खा.प्रितमताई मुंडे यांनी पाच वर्षांच्या काळात १७ कोटी रुपयांचा निधीचा विनियोग करताना एकूण ३४० विकास कामे जिल्ह्याकरिता सुचविली, या विकास कामांची मूळ किंमत १७ कोटी ४४ लक्ष रुपये होते. अर्थात प्राप्त निधी पेक्षा ४४ लक्ष रुपये किमंत असलेले अतिरिक्त विकास कामे या काळात सुचविण्यात आली आहेत. पाच वर्षात मिळालेल्या १७ कोटी रुपये स्थानिक विकास निधी पैकी ०१ पैसा देखील शिल्लक अथवा अखर्चित राहिला नाही. याउलट निधी कमी पडला आहे.

--------------

### राजकारणात जाती-पातीचे उगवलेले

बोलत होत्या. घाटनांदुर, सायगाव, वाघाळा, हनुमंतवाडी, तळणी, हातोला, जवळगाव, पुस, तळेगाव येथे मतदारांशी गाठीभेटी घेत संवाद साधला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अच्युत गंगणे, राष्ट्रवादीचे गोविंद देशमुख,बन्सी अण्णा सिरसाट, घाटनांदुरचे सरपंच महेश गारठे, वैजनाथ आप्पा गारठे, शिवाजी सिरसाट, शाम आपेट, नेताजी देशमुख, गणेश कराड, गोपाळराव दरगड, दिलीप गिते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र टीम करावी. दोन्ही पक्षाच्या गट व गण प्रमुखांनी गणांचा दौरा करून मतदारांशी थेट भेटावं असं सांगत पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी मंत्री असताना मतदारसंघांत खूप निधी दिला, सत्ता गेल्यावर अडीच वर्षे मी दिलेलीच कामे सुरू होती. मतदारसंघातील सगळ्याशी माझे ऋणानुबंध आहेत. हक्काने तुम्ही मला सर्व सांगू शकता. सर्व स्थिती सकारात्मक आहे त्यामुळे अशी संधी परत येणार नाही. मला राजकारणाचा आणि प्रशासनाचा अनुभव असल्याने याचा उपयोग विकासासाठी करत राहील. मागील पाच वर्षांत पद नसतांना लोकांशी अटेचमेन्ट ठेवली. बरीच कामे केली. इथला रेल्वेचा थांबा पूर्ववत करून देऊ.काहीच अडचण येणार नाही. खासदार झाल्यास पंतप्रधान मोदींकडून मी हक्काने काम करून घेऊ शकते. याचा आपल्या जिल्हयाला फायदाच होईल.

**जातीपातीचे तण काढून फेका**

राजकारणात जाती-पातीचे खूप तण सध्या उगवले आहे ते तण काढून फेकून द्या. आलेली संधी वाया घालू नका. विरोधक बुद्धिभेद करतील, कारण त्यांचेकडे दुसरा अजेंडा नाही. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना विकासाचे व्हिजन समजावून सांगा. तुम्ही संधी दिल्यास जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलून टाकील असा विश्वासही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्याला मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करायचे आहे. हे विसरू नका त्यामुळे अधिकाधिक मताधिक्य मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे. असे आवाहनही पंकजाताईंनी केले.

**तुमच्या मतातून जिल्ह्याचा विकास साधणार**

मंत्री असताना मी कधी कुणाला त्रास दिला नाही.जातीवादाला थारा दिला नाही त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला पुढची पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्या.तुमचे मत वाया जाऊ देणार नाही जिल्ह्याचा विकास करून तुमच्या मताची परतफेड करेन असा विश्वास याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

**सायगावला दर्ग्यात चादर चढवून घेतले दर्शन ; मुस्लिम बांधवांशी मनमोकळा संवाद**

आजच्या दौऱ्यात पंकजाताई मुंडे यांनी सायगाव येथील दर्ग्यात चादर चढवून दर्शन घेतले. यावेळी तिथल्या धर्मगुरूंचे आशीर्वाद घेतले. तसेच उपस्थित मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. घाटनांदुरकडे मार्गस्थ होत असताना तळणी, हनुमंतवाडी येथील ग्रामस्थांनी वाहनाचा ताफा थांबवून पंकजाताईंचे स्वागत केले.

------------

### सुप्रीम कोर्टाकडून बॅलट

सूचनेलाही नकार दिला. मतपेट्यांमध्ये टाकण्यापूर्वी ते निवांतपणे पहा, असेही मत यावेळी नोंदविले. न्यायालयाने निवडणूक आचार नियमांच्या कलम ४९ एमए च्या विरोधात हस्तक्षेप करण्यास नकार दिला, जो मतदार ज्याची तक्रार (काढलेली मते आणि मतांची मोजणी) जुळत नसल्याची तक्रार दाखल करण्यासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम १७७ अंतर्गत निवडणूक अधिकाऱ्यांनी सुरू केलेल्या दंडात्मक कारवाईला आकर्षित करेल, असेही यावेळी सांगितले. खंडपीठाने याचिकाकर्ते, एनजीओ असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि अरुण कुमार अग्रवाल, देशभरातील १००% ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीचे क्रॉस-व्हेरिफिकेशन निर्देशित करण्याचा युक्तिवाद नाकारला. सध्या, कोणत्याही विधानसभा मतदारसंघात केवळ पाच टक्के मोजणी यादृच्छिकपणे पडताळल्या जातात. सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करेपर्यंत तो एक टक्का होता.

-------------

### पंतप्रधान मोदींवर ६ वर्षांसाठी

तक्रार जोंधळे यांनी निवडणूक आयोगाकडेही केली होती. त्यामध्ये त्यांनी निवडणूक आयोगाकडे भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ अ अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतू निवडणूक आयोगाने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयात पंतप्रधानांच्या वक्तव्याविरोधात याचिका दाखल केल्याचे जोंधळे यांनी सांगितले. या याचिकेवर २९ एप्रिल रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

-----------

### छाननीत १९ बाद

विकास आघाडी, जावेद सलीम सय्यद, टिपू सुलतान पार्टी, ताटे महेंद्र अशोक, आंबेडकरिस्ट रिपब्लिकन पार्टी, भीमराव जगन्नाथ दळे, अखिल भारतीय परिवार पार्टी, माणिक बन्सी आदमाने, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, मुक्ता भिमराव दळे, दलित शोषित पिछडा वर्ग अधिकार दल, रविकांत अंबादास राठोड, समनक जनता पार्टी, शरद बहिनाजी कांबळे, ऑल इंडिया नॅशनल रक्षा सेना, शेषेराव चोखोबा वीर, प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी, अपक्ष वैध उमेदवार उदयभान नवनाथ राठोड , कस्पटे गणेश व्यंकटराव, गणेश नवनाथराव करांडे, गणेश भाऊसाहेब कोळेकर, गफ्फार खान जब्बार खान पठाण, गोकुळ बापूराव सवासे, गंगाधर सिताराम काळकुटे, जावेद सिकंदर मोमीन, तुकाराम विठोबा उगले, दत्ता सुदाम गायकवाड, नाजेम खान जब्बार खान पठाण, पाराजी तुळशीराम आगे, प्रकाश भगवानराव सोळंके, भास्कर किसन शिंदे, भास्कर बन्सी खांडे, मुबीन जुबेरी झहीर उल अफ्राक, मुस्तफा मैनोदिन शेख, राजेंद्र अच्युतराव होके, रासवे संतोष उत्तम, रेहमान बाहोद्दीन सय्यद, लक्ष्मीबाई बाजीराव मोरे, वचिष्ठ उद्धव कुटे, वसीम शे. सलीम शेख, विनायक तुकाराम गडदे, शितल शिवाजी धोंडरे, शेख एजाज शेख उमर, शेख तौसिफ अब्दुल सत्तार, शेख याशेद शेख तय्यब, श्रीराम विठ्ठलराव खळगे, सतीश पद्माकर कापसे, संमशेरखाँ साहेबखाँ पठाण, सय्यद मिनहाज अली, सलाउद्दीन खान पठाण, सलीम अल्लाबक्ष सय्यद, सादेक इब्राहिम शेख, सादेक हुसेन मोहम्मद, सारिका बजरंग सोनवणे, सुलेमान खैरोद्दिन महमद, हिदायत सादेख अली सय्यद. अशी अपक्ष उमेदवारांची नावे आहेत. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील.

------------

cmyk

## बीड-नाथापूर रोडवर टेम्पोने मोटारसायकलस्वाराला उडविले;एक ठार

बीड : तालुक्यातील नाथापूर रोडवरील राणुबाई नगर येथे टेम्पो चालकाने मोटारसायकलला उडविले. त्याला रूग्णालयात दाखल करेपर्यंत त्याचा मृत्यू झाला.शुक्रवार (दि.२६ एप्रिल) सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास घडली.या प्रकरणी उशीरापर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंद करण्यात आला नव्हता. बीड तालुक्यातील उमरद येथील तरूण गोविंद श्रीकृष्ण घोलप (वय २५) हा शुक्रवार (दि.२६ एप्रिल) सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास जवळ्याकडून उमरीकडे मोटारसायकल (क्र.एम.एच.२३-एम-१८८१) वरून जात असताना बीडकडून विटांचा टेम्पो (एम.एच.२५-पी-०९४४) या टेम्पोने जोराची धडक दिली.यामध्ये मोटारसायकल उडून रस्त्याच्या बाजूला पडली. तर गोविंद घोलप हे एका बाजूला पडले. घटना घडताच आजूबाजूच्या लोकांनी गोविंद घोलप यांना जिल्हा रूग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटना घडल्याचे कळताच पिंपळनेर पोलिस ठाण्याचे कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.गोविंद घोलप यांच्या पश्चात आई-वडील,एक भाऊ असा परिवार असल्याचे समजते. या प्रकरणी उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.घटनेची माहिती उमरी परिसरात कळताच गावासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# संत बंकटस्वामींच्या ७१ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची थाटात सांगता

## कीर्तनकार घडविण्याचे चालते बोलते विद्यापीठ बंकटस्वामी महाराज होते -महंत श्री.ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे

**बीड । प्रतिनिधी**

वारकरी कीर्तन परंपरेचे भक्ती सूर्य महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ७१ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची बीड तालुक्यातील अंधापुरी गावात हजारो भाविक भक्ताच्या उपस्थितीत थाटात सांगता झाली. श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या कीर्तनाला भाविकांनी अलोट गर्दी केली होती यावेळी बोलतांना मेंगडे महाराज म्हणाले कीं नारळी सप्ताह हे वारकरी संप्रदायाचे ऐक्यता आणि समता प्रस्थापित करण्याचे भक्ती केंद्र आहे. नारळी सप्ताहा मधून सामाजिक सलोखा आणि समाज प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली जाते, संत बंकट स्वामी महाराज हे कीर्तनकार घडवणारे चालते बोलते विद्यापीठ होते असे प्रतिपादनही महाराजांनी केले

या यावेळी प्रमुख उपस्थिती ह भ प रामहरी महाराज डंबरे, भीमसेन महाराज भोसले, किसन महाराज पवार, भागवताचार्य संतोषनंद महाराज शास्त्री,रामेश्वर महाराज हंगेवाडीकर,

श्री ह भ प नाना महाराज कदम, ह भ प सुरेश महाराज जाधव,श्री ह भ प विष्णुपंत लोंढे गुरुजी, श्री ह भ प वसंत महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज जगताप, श्रीकृष्ण महाराज यादव ,श्री ह भ प अच्युत महाराज घोडके, दिनेशानंद महाराज शास्त्री, भागवताचार्य प्रेमानंद महाराज ,श्री ह भ प योगेश महाराज जोगदंड , रमेश भाऊ पोकळे स्वप्निल गलधर भारत बाप्पा काळे, अशोक शिंदे ,कालिदास आप्पा पाटील, यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे श्री गुरू बंकटस्वामी महाराज यांचा वै. संत सुदामदेव महाराज यांनी सुरू



केलेला ७१ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची थाटात सांगता झाली. सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे कीर्तने झाली.तसेच सुप्रसिद्ध भागवत कथाकार संतोशानंद शास्त्री महाराज यांचे श्रीमद्? भागवत कथा

संपन्न झाली..त्याबरोबरच ज्ञानेश्वरी पारायन, गाथा भजन, कीर्तन प्रवचन आदी कार्यक्रमाची रेल चेल होती. गुरुवारी सकाळी दिंडी नगर प्रदक्षिणा नंतर काल्याच्या कीर्तनाला सुरुवात झाली. यावेळी जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगपर गौळनी वर मेंगडे महाराज यानी चिंतन मांडले.

गोकुळीच्या सुखा अंतपार नाही लेखा !बाळकृष्ण नंदाघरी आनंदल्या नरनारी !!

या संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर महाराजांनी चिंतन मांडले

पुढे बोलताना महाराज म्हणाले की. महाराष्ट्रात नारळी सप्ताह ही खूप मोठी परंपरा आहे बंकटस्वामी महाराज याच्या सर्व शिष्य मंडळीनी फिरत्या सप्ताहाच्या माध्यमातून संपूर्ण समाज एकत्रित करण्याचे खूप मोठे काम केले. संत मंडळीनी गोकुळमधील गौळनीच्या प्रेम भक्तीचा उल्लेख करत श्रीकृष्ण चरित्र हे उच्चरनिय आहे.आज समाजातील सर्व प्रश्नाची उत्तरे संत साहित्यात मिळतात.राजसत्ता ही धर्म सत्तेच्या मार्गदर्शनाने चालली पाहिजे.तर सुसमाज निर्माण होवून शकेल असे विचार मांडले. राग लोभ आणि भांडण बाजूला ठेवून अध्यात्मा बरोबर ऐक्यने राहण्याचा मार्ग ही सांगीतला. कीर्तनानंतर ज्योती विनायक मेटे यांनी मनोगत व्यक्त करताना साधुसंतांचा आशीर्वाद समाजातील सकारात्मक ऊर्जा मिळते आणि ऊर्जा देणारी केंद्र आहेत त्याचे सर्वांनी संवर्धन करावे असे विचार मांडले. यावेळी ७२ व्या नारळी सप्ताहाचा नारळ मान्यवर मंडळी च्या उपस्थितीत मौजे गावकरी मंडळी सावरगाव ता.जि.बीड या ठिकाणी देण्यात आला. कीर्तनानंतर गावकरी मंडळी अंधापुरी यांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शन व गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध विधायक कार्यक्रम आयोजित करण्यात आले...यावेळी बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व गुनीजन टाळकरी महाराज मंडळीची उपस्थित होती.



**म्हसोबावाडी : आष्टी तालुक्यातील मांडवा येथील उपसरपंच संतोष मुटकुळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम,भाजपा जेष्ठ नेते रावसाहेब मुटकुळे, पत्रकार संतोष नागरगोजे, अक्षय विधाते,प्रशांत श्रीखंडे, अंगद पवार, विक्रम पवार, विनायक मुटकुळे, प्रकाश श्रीखंडे, सचिन मुटकुळे, ज्ञानेश्वर पवार, परमेश्वर जाधव आदी दिसत आहेत.**

# वाळू माफियांनी नाही तर अधिकाऱ्यांनी केला गेवराई तालूका बदनाम

## गोदापात्र तूमच्या बापाची जाहागिरी आहे का? रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंतच वाळूची वाहतूक सुरू ठेवायला

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणूसाठी आदर्श अंचार संहिता सुरू आहे याच पालन कोण? करतंय आणि भंग कोण?करतंय यांचा विचार व्हायला हवा गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन,म्हाळजपिंपळाव सावळेश्वर,या आदी भागातून गेल्या महिना भरापासून रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत वाळू उपसा सुरू आहे याला कुनाचा आर्शिवाद आहे अनेक अधिकारी गेवराईला फक्त वाळूचा मलिदा लाटण्यासाठीच येतात का?असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जाऊ लागला आहे.तसेच आपल्या बापाची जहागिरी असल्याप्रमाणे टाईम टेबल देऊन वाळू उपस्याला परवानगी दिली कूणी?गेवराई तालुका वाळू माफियांनी नाहीतर अधिकार्यांनीच बदनाम केला आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,वाळू हा विषय गौणखनिज अधिकारी तसेच महसुलचे तहसिलदार यांच्या अदीपत्याखाली येतो पोलिसांना वाळूची गाडी पकडण्याचा अधिकार नाही परंतू चोरीचे कारण समोर देत पोलिसांचा वाळू प्रकरणात हस्ताक्षेप असतो महसूल तर लांबच पण आधी पोलिसांना भेटावे लागते ही वास्तूस्थिती आहे गेवराई तालुका हा वाळू माफियांनी नाही तर अधिकारी यांनी बदनाम केला आहे दररोज या तालुक्यातून वाळूचे हिशोब पकडला तर करोडो रुपयांचा महसूल पोलिस आणि महसुलचे कर्मचारी यांच्या साक्षीने व परवानगीने चोरला जातो गोदापात्र ही कूनाच्या बापाची जाहिगिरी आहे का? काही गावांत तर चक्क सामान्य नागरिकांना रस्त्यावरून वागू देत नाहीत अनेक ठिकाणी वाळूच्या गाडीने झालेल्या अपघातात मयत झालेल्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे त्यांचे संरार उद्धवस्त झाले आहेत तालूक्यातील प्रस्तापिताना राजकारण करायचे असल्याने त्यांचे बगलबच्चे यात असल्या कारणाने याविषयी आवाज उठवत नाहीत अशी चर्चा आहे काही मंडळी चक्क स्वत:च्या स्वार्थासाठी हम करे तो कायदा अश्या अभिरभावात वावरत आहेत कायद्याचे रक्षक असल्याचे भासवतात तसेच काही जूनियर कर्मचारी हे सुद्धा कार्यशून्य आहेत परंतू आम्ही फार ज्ञानी असल्याचे भासवतात महसूल मधिल कर्मचारी हे वाळू तस्करी रोखू शकत नाहीत त्यांच्याकडे अपूरे मनुष्यबळ आहे आणि कार्यवाया करण्यास सक्षम देखील नाही पोलिसांचा मुद्दा आला तर ते सांगतात कायदा आम्हाला वाळू पकडण्याची किंवा गाडी अडवण्याची परवानगी देत नाही त्यामुळे तेरी बी चूप आणि मेरी ही चूप अश्या पद्धतीने टाईम टेबल देऊन आदर्श आचार संहितेचा भंग करून कायदा व सुवैस्थेचे तिन तेरा होत असल्याचे चित्र पहावयास मिळत असून वरिष्ठ अधिकारी यांना आपले कार्यलय सुटत नाही तसेच गेवराई तालुक्याच्या एक प्रमुख पदावर मुक्के वरिष्ठ अधिकारी बसले आहेत ते कधीच कुनाला काही बोलत नाहीत अशी असनारी परिस्थिती तालुक्यात निर्माण झालेली आहे.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### पारधी समाजातील १५ जणांनी

तसेच शासकीय योजनेचा लाभ मिळत नव्हता. अशा भटक्या विमुक्त पालात राहणाऱ्यांचा सर्व्हे करण्याच्या सुचना प्रहारचे संस्थापक आमदार बच्चू कडू यांनी दिल्या होत्या. प्रहारचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांच्या मार्गदर्शनाखाली संजय वाघमारे यांच्या पुढाकाराने निवडणूक विभाग बीएलओच्या पडताळणीनंतर भारतीय नागरिकत्व बहाल करुन मतदार यादीत त्यांची नावे समाविष्ट करण्यात आली होती.

### कुणब्याच्या पोराचे जातीचे प्रमाणपत्र

करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर टीका टिप्पणी करून मनोरंजन केले जात आहे. तर सत्ताधारी खासदारांनी आपल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात विकास निधी खर्च न केल्याने निधी परत गेल्याच्या मुद्द्याला धरून बजरंग सोनवणे यांचा विरोधकांना तोंडघशी पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे जनता विकासाच्या मुद्यावरून सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### पंकजाताईंचा राज्यातील

असेल तर त्यांना मते कोण देणार ? आता राज्यातील की देशातील मतदार मते देणार ? असा सवाल उपस्थित करीत कोणाचे नाव न घेता त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पंकजाताई मुंडे यांच्या पक्षांतर्गत कुरघोडीवर निशाणा साधला. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्ह्यातील स्वाभिमानी मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मतदान करण्याची विनंती केली. प्रचार दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष व इंडिया आघाडीतील मित्र पक्षाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बजरंग सोनवणेंची बैलगाडीतून मिरवणूक

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे व महेबुब शेख हे जेधेवाडी व जाटनांदूर येथे गेले असता या गावातील नागरिकांनी त्यांना बैलगाडीत बसवून ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत गावातून मिरवणूक काढली. तर राक्षसभवन येथे एका विवाह सोहळ्यात वधू - वरांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी गेले असता वऱ्हाडी मंडळींनी त्यांचे उस्फूर्तपणे स्वागत केले. यावेळी त्यांनी नव वधू - वरांना शुभेच्छा दिल्या.

### माजीमंत्री सुरेश नवलेंनी

घेतांना दिसत नाही. मी मांडलेल्या भावना योग्य कि अयोग्य याचीही दखल पक्षाला घ्यावी वाटलेली नाही. याचा अर्थ पक्षामधील संवादाची दारे बंद झालेली आहेत.

मित्रपक्षाचा दबाव पक्ष नेतृत्व झुंगारेल असे आता वाटत नाही. कदाचीत पक्ष नेतृत्वाची काही अडचन असु शकेल. मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे ''प्रभूरामचंद्र'' मित्रपक्षा पासुन संरक्षण करोत अशी प्रार्थणा करतो आणि पक्षाला रामराम ठोकतो.

## लमाणवाडी तांडा ग्रामस्थ लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकणार

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील लमाणवाडी तांडा क्रमांक एक आणि दोन यांचा महसुली गावात रुपांतरीत करण्यासंदर्भात आदेश झालेला असतानाही त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे सदरील भागाचे नागरिक लोकसभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकुन मतदान करणार नसल्याचे प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.या संदर्भात ग्रामस्थांनी ग्रामसभेत निमगाव या गावातून लमाणवाडी क्रमांक एक आणि दोन यांचे महसूल गावांमध्ये रूपांतर करण्यात आले नाही तर लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकून कोणीही मतदान केंद्रावर जाणार नाहीत अशी भूमिका घेतली आहे.अशा वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबधित अधिकारी व शासन जबाबदार राहील असे देखील निवेदनात म्हटले आहे.या निवेदनावर उत्तम बक्षी राठोड,यशोदा उत्तम राठोड,राजेंद्र राठोड,शिवाजी चव्हाण,रतन चव्हाण,रोहिदास राठोड,संजय राठोड,विकास राठोड,शीला राठोड,जनाबाई राठोड,संतोष चव्हाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ईडी, सीबीआयचा धाक दाखवणाऱ्या भाजप सरकारला हद्दपार करा -येडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड देशामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या जातीजातीमध्ये फूट पाडणाऱ्या देशाचे नाव उंचवणाऱ्या व शिक्षण आरोग्य पाणी विद्युत यामध्ये क्रांती करणाऱ्या करणाऱ्या नेत्यांना आम आदमी पार्टीचे सर्व सर्व मा अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री दिल्ली सरकार मा. मनीष सिसोदिया उपमुख्यमंत्री दिल्ली सरकार सत्येंद्र जैन आरोग्य मंत्री दिल्ली सरकार मा. संजय सिंग खासदार यासारख्या आम आदमी पार्टीच्या नेत्यांना खोटे आरोप करून ईडी सीबीआयच्या मार्फत धाक दाखवून बीजेपीच्या वॉशिंग पावडर मध्ये या नाहीतर जेलमध्ये जा अशी परिस्थिती निर्माण करून दहशत पसरण्याचे



काम करत आहे ज्या नेत्यांनी संपूर्ण जगामध्ये शिक्षण आरोग्य पाणी विद्युत अशा क्षेत्रांमध्ये क्रांती केली पण त्यांना जेलमध्ये टाकले याचा हिसाब करण्यासाठी भारतीय जनता पार्टीला धडा शिकवण्यासाठी येणाऱ्या १३ तारखेला लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीचे लोकप्रिय उमेदवार मा .बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे असे आव्हान आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे करत आहे.

## शिरूरमध्ये २ विद्यार्थ्यांकडून प्राध्यापकास गजाने मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

दहावी किंवा बारावी बोर्ड परीक्षांच्या काळात परीक्षा केंद्रावरील कॉपी आणि वाद आता साधारण बाब झाली आहे. मात्र, विद्यापीठाच्या पदवी परीक्षांमध्येही शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये वादाची भीषण घटना घडली आहे. बीडच्या शिरूर तालुक्यातील श्रीपत वाडी येथे भगवान बाबा महाविद्यालयात दोन विद्यार्थ्यांनी चक्क प्राध्यापकाला गजाने मारहाण केल्यामुळे परीक्षा केंद्रावर एकच गोंधळ उडाला होता. विद्यार्थ्यांकडून गजाने मारहाण झाल्याने परीक्षा केंद्रावरील इतर शिक्षकांनी संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणी, पोलिसांनाही कळवण्यात आले आहे.

सध्या औरंगाबाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठाच्या बीएससीच्या परीक्षा सुरू आहेत. श्रीपतवाडी येथील परीक्षा केंद्रावर विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वाद झाला. परीक्षेची प्रश्नपत्रिका का दिली नाही म्हणून दोन विद्यार्थ्यांनी प्राध्यापकाला चक्क गजाने मारहाण केली. या घटनेत प्राध्यापक गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात नेण्यात आले होते. याप्रकरणी, मारहाण करणार्या दोन्ही विद्यार्थ्यांवर शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या घटनेमुळे परीक्षा केंद्रावर काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांकडून अशारितीने शिक्षकांना मारहाण होत असेल तर परीक्षा घ्यायच्या कशा, असा सवालही संतप्त शिक्षकांनी विचारला आहे. भगवान बाबा महाविद्यालयामध्ये प्राध्यापक अशोक वारे हे परीक्षा केंद्रावर असताना राहुल गर्जे आणि गंगाधर गर्जे या दोन विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका का दिली नाही म्हणून प्रा. अशोक वारे यांना गजाने मारहाण केली. या मारहाणीत अशोक वारे हे गंभीर जखमी झाले आहेत त्यांना शिरोळ येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती ठीक असून मारहाण करणार्या दोन्ही विद्यार्थ्यांवर शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांनीही तत्काळ या घटनेची गंभीरतेने दखल घेत विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील अधिक तपास पोलीस करत आहेत.

# ओबीसीच्या संरक्षणासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लोकसभेच्या रिंगणात - संतोष रासवे

## मोटर सायकल रॅली काढत ओबीसीचे अपक्ष उमेदवार संतोष रासवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसीच्या संरक्षणासाठी आणि शेतकर्यांच्या न्याय हक्कासाठी, सर्वसामान्य नागरिकांच्या कामासाठी मला निवडून द्यावे. सर्वसामान्य नागरीकांचे प्रश्न लोकसभेत माडण्यासाठीच बीड लोकसभेच्या रिंगणात उभा राहिलो आहे असे मत ओबीसी अपक्ष उमेदवार संतोष रासवे यांनी बीड येथे भव्य मोटार सायकल रॅलीच्या समारोप प्रसंगी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले.

बीड लोकसभेसाठी ओबीसी माळी समाजाचे नेतृत्व म्हणून संतोष रासवे यांनी बीड लोकसभेच्या निवडणूकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गुरूवार दि. २५ एप्रिल रोजी त्यांनी बीडमध्ये शक्तीप्रदर्शन करीत भव्य मोटरसायकल रॅली काढली.

ओबीसींच्या न्याय हक्कासाठी,



आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी, शेतकर्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी मला शेतकर्याचे लेकरू म्हणून संसदेत पाठवा. मी नक्कीच शेतकर्यांच्या प्रश्नावर संसदेमध्ये आवाज उठवून त्यांच्या हक्कासाठी ताकदीने प्रश्न उपस्थित करुन शेतकर्यांना न्याय मिळवून देईल. तसेच दीन-दलित, दुबळे, वंचित, उपेक्षित सर्वसामान्यांसाठी अहोरात्र काम करून त्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेले संविधान वाचविण्यासाठी तसेच घटनेच्या संरक्षणासाठी जीवाची आहुती देईल, मात्र घटनेला छेडछाड करू देणार नाही. आज समाजात बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. मोदी सरकारने मोठमोठी आश्वासने देवून या देशातील तरुणांना बेरोजगार केले आहे. डिजीटल प्रणाली अस्थित्वात आणून सर्वसामान्यांची लुट होत आहे. कोठेही गेले तरी नगदी चलन आमलत येण्याचे प्रमाण कमी झाली आहे. जिकडे तिकडे भीम ॲप द्वारे व्यवहार करण्याचे तंत्र मोदी सरकार करत आहेत. आज गोरगरीब शेतकर्यांना डिजीटल युग काय हे हेच कळत नसून त्यामुळे त्यांची फसवणूक मोठया प्रमाणावर होत आहे. फोन-पे, गुगल-पे आणि इतर ॲपद्वारे सर्वसामान्यांची दिवसेंदिवस लुट होऊ लागली आहे. याला आळा घालण्यासाठी भाजपाच्या उमेदवाराला घरी बसवविण्याची हीच सुवर्ण संधी. बीड लोकसभा मतदार संघाला विकासाच्या वाटेवर जायचे असेल तर माझ्या सारख्या नवतरुणाला लोकसभेत पाठवा नक्कीच तुम्ही दिलेल्या आशीर्वादाचे सोने करील असेही संतोष रासवे यांनी म्हटले आहे.

संतोष रासवे यांचा उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाभरातून खरेदी देखरेख संघाचे माजी संचालक विश्वनाथ शेजुळ, सरपंच दत्ता आढाव, महाराष्ट्र सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत, युवा नेते आनंद आढाव, अशोक आढाव, कृष्णा गोरे, कृष्णा शेजुळ, भगवानराव आढाव, दत्ता लव्हाळे, ज्ञानेश्वर आढाव, भैय्या देवकते, शेरकर, मच्छिंद्र आढाव, सुखदेव आढाव यांच्यासह संतोष रासवे यांच्यावर प्रेम करणारे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक हजारो बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

cmyk

# महाराष्ट्रावर अन्याय, गुजरातच्या कांद्याला निर्यातीस परवानगी; केंद्राचा निर्णय!

पुणे : देशभरात, विशेषतः महाराष्ट्रात कांद्यावर निर्यात बंदी असताना, केंद्र सरकारने निवडणुकीच्या धामधुमीत गुजरातमधून २००० मेट्रिक टन पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीस मंजुरी दिल्याने राज्यातील व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. केंद्र सरकारने मुंद्रा पोर्ट, पिपाव पोर्ट आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईच्या जेएनपीए बंदरातून गुजरातच्या या कांद्याच्या निर्यातीस परवानगी दिली आहे. तर दुसरीकडे, महाराष्ट्रातील कांद्यावर ८ डिसेंबर २०२३ पासून बंदी घातली आहे. ज्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये संताप आहे.

केंद्र सरकारच्या या केवळ गुजरातलाच कांदा निर्यातीस परवानगी देण्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. नाशिक, पुणे, जळगाव, अहमदनगरसारख्या कांदा उत्पादक जिल्ह्यातील शेतकरी या निर्णयामुळे संतप्त आहेत. यावरून अनेकदा आंदोलनेही करण्यात आली आहेत आणि बाजार समित्या बंद ठेवल्या



गेल्या आहेत. राज्यात सध्या लाल आणि उन्हाळी कांदा देशभरातील बाजारपेठेत कवडीमोल भावाने विकला जात आहे. अशावेळी केंद्र सरकारने फक्त गुजरातमध्येच पिकणाऱ्या पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीस २५ एप्रिल २०२४ रोजी परवानगी दिली आहे.

एनसीएलऐवजी थेट निर्यातदारांना मंजुरी

केंद्र सरकारच्या या निर्णयानुसार गुजरातचा २००० मेट्रिक टन कांदा एनसीएल या सरकारी संस्थेऐवजी थेट निर्यातदारांच्या माध्यमातून निर्यातीस परवानगी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. निवडणुकीच्या आधी मतांसाठी शेतकऱ्यांना फसवणूक दिली जात आहे, आणि निवडणुकीनंतर त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. या निर्णयाविरोधात शेतकरी संघटनांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे आणि केंद्र सरकारकडून तात्काळ निर्णय बदलण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी राज्य सरकारनेही तातडीने पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संघटनांकडून बोलले जात आहे.

---

## पावसामुळे डागाळलेल्या आंब्याचे असे करा व्यवस्थापन!



सध्या महाराष्ट्रात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे, त्यामुळे आर्द्रतेमध्ये वाढ झाली आहे. फळांचा राजा आंब्याचा मोसम सुरू असताना या पावसामुळे आंब्याच्या फळांवर डाग पडत आहेत. करपा रोगामुळे आंब्याच्या फळांवर काळे डाग पडत आहेत. तसेच देठकूज या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता देखील आहे.

अशा परिस्थितीत आंबा टिकण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करणे उपयुक्त होईल. यासाठी काही विशेष उपाय करने गरजेचे आहे.

अशी घ्या काळजी : शेतकऱ्यांनी अझॉक्सीस्ट्रॉबिन या बुरशीनाशकाची २३.५ ई.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात स्टिकर मिसळून फवारणी करावी. आर्द्रतेमध्ये वाढ झाल्यामुळे २ फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यासाठी हेक्टरी ४ नग रक्षक सापळे वेगवेगळ्या ठिकाणी झाडांच्या खालील बाजूंच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावीत आणि बागेत स्वच्छता ठेवावी. तयार झालेली आंबा फळे काढताना सकाळी १० वाजेपर्यंत व सायंकाळी ४ नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने काढणी करावी. काढणी पश्चात बुरशीजन्य रोगांपासून बचाव करण्यासाठी काढलेली फळे लगेचच ५० अंश सेल्सिअस पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर सावलीत वाळवावीत. तसेच फळांची वाहतूक करताना रात्रीच्या वेळीस करावी.

## मुंबईसह कोकणात उष्णतेची लाट, पुढील दोन दिवस यलो अलर्ट

मुंबई : महाराष्ट्रावर एकीकडे अवकाळी पावसाचं संकट कायम आहे, तर दुसरीकडे मुंबईसह, ठाणे, कोकणात उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. पुढील ४८ तासांसाठी हवामान विभागाने () कोकणात तापमान वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. पुढील दोन दिवस मुंबई, ठाणेसह कोकणासाठी हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली असून उष्णतेचा यलो अलर्टही जारी केला आहे. त्यातच महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकटही कायम आहे. पुढील ४८ तासांत जोरदार पावसाची शक्यताही हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे.

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये पुढील ४८ तासांत पावासाची शक्यता आहे. काही जिल्ह्यामध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ आणि ३०-४० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणातील तुरळक क्षेत्रात उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. कोकणातील तुरळक भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

मुंबईसह या भागात उष्णतेची लाट

हवामान विभागाने जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार, पुढील ४८ तासात राज्यात उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. आयएमडीने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, नाशिक, अहमदनगर या भागात उष्णतेचा यलो अलर्ट जारी केला आहे.

महाराष्ट्रात या भागावर अवकाळी पावसाचे ढग कायम

दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज सोलापूर, धुळे, नंदुरबार, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या भागात पावसाची शक्यता आहे. २७ एप्रिलला जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना या जिल्ह्यात पावसाची हजेरी लागण्याचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे. २६ आणि २७ एप्रिलला धुळे, नंदुरबार, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या जोरदार पाऊस पाहायला मिळू शकतो.

हवामान खात्याचा अंदाज काय सांगतो?

उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या तडाखा बसताना दिसत आहेत. मात्र, देशाच्या काही भागात अवताळी पावसाने हजेरी लावल्याने वातावरण आल्हाददायक आहे.

तर काही ठिकाणी अवकाळी पावसामुळे शेती आणि फळबागांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. पंजाब, हरियाणा आणि महाराष्ट्राच्या काही भागात पावसाची शक्यता आहे.





## भरघोस उत्पादनासाठी जाणून घ्या कापसाचे प्रमुख वाण

खरीप हंगामाला येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे. खरिपात यंदाही कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड होण्याची शक्यता आहे. खरे तर गेल्या वर्षी कमी पाऊस झाला होता तरी देखील कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली.

यंदा मात्र हवामान खात्याने चांगल्या पावसाची शक्यता वर्तवली असून, यामुळे यावर्षी कापूस लागवड वाढणार असल्याचे जाणकारांकडून सांगितले जात आहे. याच पार्श्वभूमीवर कापसाच्या काही प्रमुख जातींची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

'हे' आहेत कापसाचे प्रमुख वाण - नुझिवेदू सीड्स कंपनीचे आशा बी टी २ :

गेल्या वर्षी कापसाच्या या जातीपासून शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन मिळवले आहे. दुष्काळी परिस्थिती असताना देखील शेतकऱ्यांनी १८ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे.

अशा परिस्थितीत जर मान्सून सामान्य राहिला तर या जातीपासून २१ ते २२ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळू शकते, असा दावा कंपनीकडून केला जात आहे.या जातीचे कापूस बोंड टपोर असते आणि कापसाला वजन चांगले मिळते.

२७ ते २९ एमएम धागा असतो. म्हणजेच ही एक मिडीयम स्टेपल कापसाची जात आहे. बागायती भागासाठी हा वाण योग्य असल्याचे



आढळून आले आहे.

मोक्ष १५ ३९ २ : कापसाच्या या जातीपासून देखील गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन मिळवले आहे. या जातीपासून ड्रीप इरिगेशन करून गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी १९ ते २० क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी केली तरी यातून चांगले उत्पादन मिळते. या जातीच्या कापसाचा धागा हा २५ ते २९ एमएम एवढा म्हणजेच मध्यमच स्टेपल आहे. या जातीवर रसशोषक किडीचा आणि रोगांचा फारसा प्रादुर्भाव पाहायला मिळत नाही.

तुळसी कंपनीचे कबड्डी : जे शेतकरी कापसाची लागवड करतात. त्यांना या जातीची माहिती असेल. हा वाण संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय या जातीची राज्यातील अनेक भागांमध्ये लागवड केली जाते. मराठवाडा आणि विदर्भ येथील प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये या जातीच्या कापसाची लागवड पाहायला मिळते. या जातीबाबत बोलायचे झाले तर कीड, रोगास कमी बळी पडते. जास्त पाऊस पडला म्हणजे अतिवृष्टीसारखी परिस्थिती तयार झाली तरी चांगले उत्पादन मिळते. आणि कमी पाऊस पडला तरी देखील यातून चांगले उत्पादन मिळते.

युएस अॅग्री सीड्स कंपनीचे युएस ७०६७ : या जातीपासून देखील १२ ते १७ क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळते. शेतकऱ्यांमध्ये ही जात बऱ्यापैकी लोकप्रिय असून बागायती आणि जिरायती अशा दोन्ही परिस्थितींमध्ये या जातीचे उत्पादन घेतले जाऊ शकते.

अॅग्रो स्टार कंपनीचे शिवांश : या जातीची देखील राज्यातील काही शेतकरी लागवड करतात. मात्र, या जातीची बागायती भागात लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. कोरडवाहू भागात याची लागवड करू नये, असा सल्ला देण्यात आला आहे. या जातीपासून १८ ते १९ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२६ : मुघल शासक बाबर यांनी दिल्लीवरील सुलतान इब्राहिम लोदी यांचा पराभव केल्यानंत दिल्लीच्या गादीवर विराजमान झाले होते.
१६०६ : मुघल शासक बादशाहा जहांगीर यांचा मुलगा खुसरो यांनी आपले वडिल जहांगीर बादशाहा यांच्या विरुद्ध बंड पुकारल्यामुळे बादशाहने त्यांना कैद केले.
१६६७ : अंध व हलाखीत दिवस काढणार्या जॉन मिल्टनने आपले महाकाव्य पॅरेडाईझ लॉस्ट १० ब्रिटीश पाउंडला विकले.
१७७३ : भारतातील युद्धांच्या खर्चामुळे डबघाईला आलेल्या ब्रिटीश ईस्ट ईंडिया कंपनीला वाचवण्यासाठी ब्रिटीश संसदेने टी ऍक्ट करून कंपनीला उत्तर अमेरिकेशी व्यापार करण्याचा मक्ता दिला.
१८१० : बीथोव्हेनने आपले प्रसिद्ध पियानो संगीत फ्युर एलिझ रचले.
१८१३ : १८१२चे युद्ध अमेरिकेने कॅनडातील ऑन्टारियो प्रांताची राजधानी यॉर्क(आताचे टोरोन्टो शहर) काबीज केली.
१८५४ : पुण्याहूनमुंबईला तारयंत्राद्वारे पहिला संदेश पाठविला गेला.
१८६१ : अब्राहम लिंकनने अमेरिकेत हेबिअस कोर्पसचा मूलभूत हक्क निलंबित केला. यामुळे सरकारला कोणासही पुराव्याशिवाय तुरुंगात टाकण्यास मोकळीक मिळाली.
१८६५ : अमेरिकन गृहयुद्धातील उत्तरेचे सुटलेले युद्धबंदी घेउन जाणारे जहाज सुलतानावर मिसिसीपी नदीत स्फोट. १,७०० ठार.
१८७८ : कलकत्ता विद्यापीठाने स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्याची मंजूरी दिली.
१९०८ : लंडनमध्ये चौथे ऑलिंपिक खेळ सुरू.
१९०९ : तुर्कस्तानच्या सुलतान अब्दुल हमीद दुसर्याची हकालपट्टी. त्याचा भाउ मुरात पाचवा गादीवर.
१९४१ : दुसरे महायुद्ध जर्मनीचे सैन्य ग्रीसची राजधानी अथेन्समध्ये शिरले.
१९४५ : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्याने फिनलंडमधून पळ काढला.
१९५० : दक्षिण आफ्रिकेत वंशभेद अधिकृत करणारा कायदा मंजूर झाला.
१९६० : टोगोला फ्रांसपासून स्वातंत्र्य.
१९६१ : सियेरा लिओनला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९६२ : जिल्हा लोकल बोर्डाचा कारभार संपून जिल्हा परिषद कार्य करु लागली.
१९७४ : राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे १०,००० लोकांनी निदर्शने केली.
१९८१ : झेरॉक्स पार्कने माउस वापरण्यास सुरुवात केली.
१९९२ : सर्बिया व मॉन्टेनिग्रोने एकत्र येउन युगोस्लाव्ह प्रजासत्ताकची स्थापना केली.
१९९४ : दक्षिण आफ्रिकेत निवडणुका. श्यामवर्णीय व्यक्तिंना मतदान करण्यास प्रथमतः मुभा.
१९९९ : एकाच अग्निबाणाद्वारे एकापेक्षा अधिक उपग्रह प्रक्षेपित करण्याची प्रणाली भारतात तयार झाली.
२००५ : एरबसने आपले ए-३८० जातीच्या विमानाचे प्रथम प्रात्यक्षिक दाखवले.
२०११ : अमेरिकेच्या दक्षिण भागातील सहा राज्यांत टोर्नेडोंचा उद्रेक. ३०० पेक्षा ठार, कोट्यावधी अमेरिकन डॉलरचे नुकसान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०१ : चार्ल्स इमॅन्युएल तिसरा, सार्डिनीयाचा राजा.
१८२० : इंग्लंड देशातील इंग्रज तत्वज्ञानी, जीवशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ तसचं, प्रख्यात शास्त्रीय उदारमतवादी राजकीय सिद्धांतवादी हरबर्ट स्पेंसर यांचा जन्मदिन.
१७९१ : मोर्स कोड व तारायंत्राचे जनक आणि चित्रकार सॅम्युअल मोर्स यांचा जन्म. (मृत्यू: २ एप्रिल १८७२)
१८२२ : युलिसिस एस. ग्रँट, अमेरिकेचा १८वा राष्ट्राध्यक्ष.
१८८३ : नाटककार भार्गवराम विठ्ठल वरेरकर उर्फ मामा वरेरकर यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९६४)
१९०९ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.
१९१२ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर जोहरा सेहगल यांचा जन्म. (मृत्यू: १० जुलै २०१४)
१९२० : महात्मा गांधींचे अनुयायी डॉ. मणिभाई भीमभाई देसाई यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९९३)
१९२७ : कोरेटा स्कॉट किंग, मार्टिन ल्युथर किंगची पत्नी.
१९४७ : उत्तराखंड राज्याचे माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांचा जन्मदिन.
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व केरळ राज्याचे माजी राज्यपाल पी. सदाशिवम यांचा जन्मदिन.
१९७६ : पटकथालेखक भारतीय दिग्दर्शक फैसल सैफ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३० : अर्देशर तिसरा, पर्शियाचा राजा.
१५२१ : फर्डिनांड मॅगेलन, पोर्तुगीझ शोधक.
१६०५ : पोप लिओ अकरावा.
१८९८ : शंकर बाळकृष्ण दीक्षित, ज्योतिष गणिताचे श्रेष्ठ अभ्यासक.
१९३० : भारताच्या केरळ राज्यातील प्रसिद्ध समाजसुधारक व पत्रकार टी.के. माधवन यांचे निधन.
१९६० : प्रख्यात भारतीय बंगाली लेखक, रसायनशास्त्रज्ञ, शब्दकोशशास्त्रज्ञ तसचं, हास्य आणि व्यंगात्मक लघुकथा लेखक राजशेखर बासू यांचे निधन.
१९८० : पद्मश्री सहकारमहर्षी विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील यांचे निधन. (जन्म: २९ ऑगस्ट १९०१)
१९८९ : पॅनासोनिक कंपनी चे स्थापक कोनोसुके मात्सुशिता यांचे निधन. (जन्म: २७ नोव्हेंबर १८९४)
२००२ : बार्बी डॉल या प्रसिद्ध बाहुली च्या जनक रुथ हँडलर यांचे निधन. (जन्म: ४ नोव्हेंबर १९१६)
२००९ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रख्यात अभिनेते झुल्फिकार अली शाह खान उर्फ फिरोज खान यांचे निधन.
२०१७ : भारतीय अभिनेते विनोद खन्ना यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९४६)

# बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूकीच्या शेवटच्या दिवशी ५५ उमेदवारी अर्ज दाखल

## आजपर्यंत एकूण ७६ उमेदवारांनी ९९ अर्ज दाखल केले

बीड । प्रतिनिधी

३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये आज शेवटच्या दिवशी ५५ नामनिर्देशन अर्ज दाखल झाली असून आजपर्यंत एकूण ९९ उमेदवारी अर्ज दाखल केली आहेत. एकूण ७६ उमेदवारांनी ९९ अर्ज दाखल केली आहेत.

५५ नामनिर्देशन अर्ज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या समक्ष सादर केले आहेत. यामध्ये समशेरखाँ साहेबखाँ पठाण (अपक्ष), अंकुश रामा खोटे भारतीय जवान किसान पार्टी, अशोक भागोजी थोरात, बहुजन महापार्टी तथा (अपक्ष) म्हणून अर्ज सादर केला. रईसोद्दीन जकीयोद्दीन पठाण (अपक्ष) , सतीष पद्माकर कापसे (अपक्ष), भीमराव जगन्नाथ दळे, अखिल भारतीय परिवार पार्टी, हनुमंत ज्ञानोबा ताकतोडे, बहुजन भारत पार्टी, शरद बहिणाजी कांबळे यांनी दोन अर्ज ऑल इंडिया नॅशनल रक्षा सेना पार्टी या पक्षाकडून सादर केलेत., मुक्ता भिमराव दळे यांनी दलित शोषित पिछडा वर्ग अधिकार दल ( डीएसपी अधिकारी दल), गफारखान जब्बार खान पठाण यांनी दोन अर्ज अपक्ष म्हणून सादर केलेत. करुणा धनंजय मुंडे यांनी स्वराज्य शक्ती सेना या पक्षाकडून दोन अर्ज दाखल केलेत. विनायक तुकाराम गडदे, (अपक्ष), भीमराव लिंबाजी मुंडे (अपक्ष), वसीम शेख सलीम शेख यांनी बहुजन महापार्टी व (अपक्ष) म्हणून अर्ज सादर केलेत., राजेंद्र अच्युतराव होके (अपक्ष) , बाबासाहेब आबा लंबाटे, राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडी महाराष्ट्र राज्य, रविकांत अंबादास राठोड, समनक जनता पार्टी, गोकुळ बापूराव सवासे, (अपक्ष), चंद्रकांत कुमार हजारे, महाराष्ट्र विकास आघाडी, मजहर खान हबीब खान (अपक्ष) , सलीम अल्लाबक्ष सय्यद (अपक्ष), प्रकाश भगवानराव सोळंके (अपक्ष), संजय काशिनाथराव काळे (अपक्ष), नाजेम खान जब्बार खान पठाण (अपक्ष) , ताटे महेंद्र अशोक , आंबेडकरवादी रिपब्लिकन, शेषराव चोखोबा वीर, प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी तथा अपक्ष म्हणून उमेदवारी सादर केली. मुबीन जुबेरी झहीर उल अफ्राक (अपक्ष) , हनुमंत ज्ञानोबा ताकतोडे (अपक्ष) , पाराजी तुळशीराम आगे (अपक्ष), शेषेराव चोखोबा वीर, (अपक्ष), यशवंत उत्तरे गायके (अपक्ष), तथा ओबीसी बहुजन पार्टी या पक्षाकडूनही उमेदवारी सादर केली. भास्कर बन्सीधरराव खांडे (अपक्ष), दत्ता सुदाम गायकवाड, (अपक्ष), खलील रहीम शेख (अपक्ष), माणिक बन्सी आदमाने बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, तेजस अंकुश घुमरे (अपक्ष), अविनाश आत्माराम मोरे, (अपक्ष), सय्यद मिनहाज अली (अपक्ष), गणेश नवनाथ राव करांडे (अपक्ष), सारिका बजरंग सोनवणे, (अपक्ष), नविदोद्दीन मुश्ताक सिद्दिकी (अपक्ष), इनामदार अखिल अहमद शफाओद्दीन (अपक्ष), गंगाधर सिताराम काळकुटे (अपक्ष), देशमुख दत्तात्रय शिवाजी (अपक्ष), अनुरथ सोपानराव वीर (अपक्ष), असे एकूण ५५ इच्छुक उमेदवारी ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज सादर केलेत. दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल २०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील.

### आतापर्यंत सादर केलेले नामनिर्देशन अर्ज

यामध्ये कोळेकर गणेश भाऊसाहेब (अपक्ष), करूणा मुंडे(स्वराज्य शक्ती सेना), हिदायत सादेख अली सय्यद (अपक्ष),अंबादास जाधव (अपक्ष), सादेक हुसेन महम्मद (अपक्ष), संतोष उत्त्म रासवे (अपक्ष), सलाउद्दीन खान पठाण (अपक्ष),गणेश व्यंकटराव कस्पटे (अपक्ष), सादेक इब्राहीम शेख (अपक्ष), अशोक सुखदेव हिंगे (वंचित बहुजन आघाडी), पंकजा गोपीनाथराव मुंडे (भारतीय जनता पक्ष) यांनी चार अर्ज दाखल केले, प्रितम गोपीनाथराव मुंडे (भारतीय जनता पक्ष) यांनी दोन अर्ज दाखल केले, श्रीराम विठ्ठलराव खळगे (अपक्ष), मुस्तफा मैनोदीन शेख(अपक्ष), सुलेमान खैरोद्दीन महमद (अपक्ष),भिमराव जगन्नाथ दळे (अपक्ष),रहेमान बाहोद्दीन सय्यद (अपक्ष), राजेंद्र अच्युतराव होके(अपक्ष), जावेद सिकंदर मोमीन (अपक्ष), लक्ष्मीबाई बाजीराव मोरे (अपक्ष), रविकांत अंबादास राठोड (अपक्ष), देविदास यशवंत शिंदे (अपक्ष), पठाण अमजद जिलानी (अपक्ष), पठाण सरफराज बाबखाँ(अपक्ष), जावेद सलीम सय्यद (टिपू सुलतान पार्टी). अपक्ष उमेदवार– शेख तौसिफ अब्दुल सत्तार, सादिक इब्राहिम शेख, उदयभान नवनाथ राठोड, शेख एजाज शेख उमर, भास्कर किसन शिंदे, तुकाराम विठोबा उगले, शेख याशेद शेख तय्यब, वचिष्ट उद्धव कुटे, राजेंद्र अच्युतराव ठोके व शितल शिवाजी धोंडरे (दोन अर्ज). भारतीय जवान किसान पार्टी (इंडिया) पक्षाकडून अंकुश रामा खोटे यांनी अर्ज दाखल केला. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाकडून बजरंग मनोहर सोनवणे यांनी दोन अर्ज तर सारिका बजरंग सोनवणे यांनी एक अर्ज दाखल केला.

# लिंबागणेश पंचक्रोशीतील भाविक द्वारका धाम तिर्थयात्रेला रवाना



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यांच्या पावनभुमीत वास्तव्य असलेल्या बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान यांच्या वतीने मठाधिपती, महादेव भारती महाराज, मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या श्रीक्षेत्र द्वारका धाम (गुजरात) तिर्थयात्रेसाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील बेलगाव, लिंबागणेश,पिंपरनई, पोखरी, महाजनवाडी, मसेवाडी, मुळुक, सोमनाथवाडी, भाळवणी, वाघिरा, मेंगडेवाडी, देव–याची वाडी, महेंद्रवाडी, मान्याचा वाडा, रामनगर, तुकाई वस्ती येथील जवळपास ३०० भाविक भालचंद्र गणपती तसेच बेलेश्वर येथील महादेव व ईश्वरभारती यांचे दर्शन घेऊन श्रीफळ फोडून हरिनामाचा उद्घोष करत स्लिपर कोच ट्रॅव्हल द्वारे दि.२४ एप्रिल रोजी रवाना झाले आहेत.

या यात्रेचे आयोजन शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात पांडुरंग वाणी, नवनाथ शेळके, विनोद वायभट,बंडु जाधव,आजिनाथ सांगळे,भागवत कदम यांनी केले असून तिर्थयात्रेसाठी जाणा–या भाविकांना निरोप देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आलेल्या नातेवाईक, शुभचिंतकांचे अश्रू अनावर झाल्याने वातावरण भावुक झाले होते. एकुण १२ दिवसांच्या तिर्थयात्रेच्या प्रवास दरम्यान महाराष्ट्रातील नाशिक येथील त्र्यंबकेश्वर, वणी येथील सप्तशृंगी गड, गुजरातस्थित निळ कंठेश्वर , चौटीला, विरपुर, जुनागड, गिरनार, सोरटी सोमनाथ, पोरबंदर, मुळद्वारका, हर्षदमाता, द्वारकाधाम, बेटद्वारका, सिद्धपुर मातृगया, गांधीनगर, सरदार सरोवर, निळकंठ धाम, महाराष्ट्रातील वेरूळ, कैलास लेणी, बौद्ध लेणी, भद्रा मारुती,पैठण, आदि धार्मिक, ऐतिहासिक, प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन करण्यात येणार आहे. जगातील प्रत्येक धर्मानुसार पृथ्वीवरील विशिष्ट स्थाने पवित्र मानली जातात या पवित्र स्थानांना तिर्थक्षेत्रे म्हटले जाते.हिंदु धर्मात आणि संस्कृतीत तिर्थक्षेत्र व तिर्थयात्रा यांना अन्न्यसाधारण महत्व असुन तिर्थविवेचनात अनेक दृष्टीकोनातून मांडलेले आहे.भारतीय समाजात सांस्कृतिक एकात्मता टिकण्याचे प्रमुख कारण तिर्थक्षेत्र आणि तिर्थयात्रा म्हणता येईल.

# पुस शिवारात गुटखा विक्री करणारा आरोपी जेरबंद



बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ आचारसंहिता सुरू असल्याने जास्तीत जास्त अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून संतोष साबळे पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी अवैध दारू विक्रेते,जुगार,अवैध शस्त्रे बाळगणारे तसेच गुटखा विक्री करणारे आरोपींची माहिती काढुन त्यांच्यावर जास्तीत जास्त कारवाई करणे कामी अधिपत्याखालील अधिकारी अंमलदार यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत.

पुस शिवारातील एका शेतातील पत्र्याचे शेडमध्ये अवैधरित्या गुठखा साठवून त्याची पान टपरी, किराणा दुकान व इतर ठिकाणी रात्री बे रात्री चोरटी विक्री करत आहे,अशी खात्री लायकय बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी पोउपनि मुरकुटे व त्यांचे पथकाला तात्काळ बातमीचे ठिकाणी रवाना केले. सदर पथकाने आपली चोख कामगिरी बजावत बातमीच्या ठिकाणी दिनांक २५/०४/२०२४ रोजी दुपारी तीन वाजता छापा टाकला असता सदर छाप्यामध्ये आरोपी–सुभाष रामा सातलवाड रा. मेंडका ता.मुखेड जिल्हा नांदेड हल्ली मुक्काम पुस तालुका अंबाजोगाई हा जागीच मिळून आला.तो राहत असलेल्या पत्र्याच्या शेडची पाहणी केली असता त्यामध्ये १)राज निवास सुगंधी पान मसाला,२)–१ तंबाखू गुटखा तसेच विमल पान मसाला गुटखा असा एकूण ६१,५०० चा मुद्देमाल मिळून आल्याने त्यास सदरचा गुटखा कोठून आणला असे विचारले असता त्यांनी सदरचा गुटखा हा गणेश पान मटेरियल आंबेजोगाई चे मालकानी दिला असल्याची कबुली दिल्याने दोन्ही आरोपीचा विरुद्ध पोलीस ठाणे बर्दापूर गुरांना ९६/२०२४ कलम ३२८, २७२, २७३, ३४ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील कार्यवाहीसाठी पो.ठा. बर्दापूर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. सदरची कामगिरी नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्थागुशा, पोलीस उप निरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, तुळशिराम जगताप, पी.टी.चव्हाण, विकास राठोड, राहुल शिंदे,बाळु सानप, नामदेव उगले यांनी केलेली आहे.

# केरळ येथील आंतरराष्ट्रीय बहुभाषिक संमेलनासाठी कवी डॉ. प्रवीण काळे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

प्रसिद्ध साहित्यिक कवी डॉक्टर प्रवीण काळे यांची कालिकट विश्वविद्यालय केरळ येथे संपन्न होत असलेल्या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक संमेलनासाठी निवड झाली असून दिनांक १८ व१९ मे रोजी हे संमेलन कालिकट विश्वविद्यालय केरळ येथे संपन्न होणार असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील साहित्यिकांचा

समावेश यामध्ये असणार आहे. हिंदी अनुसंधान केंद्र व कालीकट विश्वविद्यालय यांच्या द्वारे आयोजित हे संमेलन राष्ट्रीय कविता महोत्सव म्हणून ओळखले जाते यात आपल्या माजलगावचे भूमिपुत्र प्रसिद्ध कवी डॉ. प्रवीण काळे यांची निवड झाल्याबद्दल अनेक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. यापूर्वीही अनेक आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये कवी प्रवीण काळे यांची निवड झालेली आहे. त्यात दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय पर्यावरण शासनमान्य संस्थेच्या वतीने आयोजित पुरस्कार सोहळ्यात आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच वर्ल्ड पीस इन्स्टिट्यूट ऑफ युनायटेड नेशन या आंतरराष्ट्रीय अमेरिकन व भारत सरकार मान्य विद्यापीठाच्या वतीने दिल्ली येथे



आयोजित हिंदी भवन येथील समारंभात ज्येष्ठ कवयित्री साहित्यिका शांताबाई शेळके यांच्या साहित्यावर संशोधन व शोध प्रबंध सादर केल्याबद्दल त्यांना सन्मानपूर्वक मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड २०२३ या अंतरराष्ट्रीय पुरस्काराने ते सन्मानित आहेत. सातत्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवणारे माजलगाव तालुक्यातील कवी प्रवीण काळे यांचे अभिनंदन सर्वच स्तरातून होत आहे. नवविकास मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात ते सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत बडोदा यवतमाळ उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातही ते सहभागी आहेत. कालीकट येथील विश्वविद्यालयातील संमेलनातील निवड त्यांच्या शिरपेच्यात अजून एक मानाचा तुरा रोवल्या गेला आहे.त्याबद्दल संस्थेचे कार्यवाह,अध्यक्ष सर्व संस्थांचालक मुख्याध्यापक शिक्षक सहकारी, परिसरातील कवी मित्र साहित्यिक यांनी अभिनंदन केले आहे.

# तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्ष लागवड व संगोपन महत्त्वाचे–शिंदे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी ग्रीन आर्मीच्यावतीने वसुंधरा दिनानिमित्त दोनशे वृक्षांची लागवड करण्यात आली या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वन श्री मच्छिंद्र शिंदे यांच्या हस्ते शहीद ऑक्सिजन पार्क मध्ये वृक्षारोपण करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर एस पी कुलकर्णी होते तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक संतोष चौधरी आणि आभार प्राध्यापक नवनाथ गायकवाड यांनी सादर केले.

प्राध्यापक शिंदे म्हणाले की आज मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडत आहे तापमानाचा पारा ४४ अंश पर्यंत जात आहे. मनुष्य उन्हात होरपळून मिळत आहे पर्यावरणात ढवळाढवळ केल्यामुळे निसर्ग माणसावर हल्ले करत आहे. वारंवार केलेली वृक्षतोड आणि पर्यावरणाचा विचार न केल्यामुळे आज ही वेळ आली आहे. जंगलांचे शहरीकरण करताना वृक्षांचा विचार केला असता तर आज उन्हाचा कहर सहन करावा लागला नसता. पण आजही ही परिस्थिती इथेच थांबवणे ही माणसाच्या हातात आहे. जर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड संगोपन आणि त्यांचे जतन झालं, पावसाच्या पाण्याची नीट व्यवस्थापन आणि पुनर्वापर झाला तर निसर्गाशी एकरूप होऊन निसर्गाचा समतोल राखता येईल.

यानंतर एस .पी.कुलकर्णी म्हणाले की संस्थेच्या परिसरात वृक्षारोपण करून शहिदाच्या नावे वृक्ष लावले आणि सर्व विद्यार्थ्यांना वर त्यांच्या संगोपनाची संस्कार केले तर तरुण पिढीमध्ये वृक्ष लागवडीची आवड निर्माण होईल. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल घाडगे व शुभम सोळंके यांनी परिश्रम केले.

# कोल्हारवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील श्री क्षेत्र कोल्हारवाडी येथे २६ एप्रिल ते ३ मे या कालावधीत भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी श्री क्षेत्र कोल्हारवाडी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

या हरिनाम सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते १० या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन होईल तर दुपारी १२ ते १ भोजन होवून दुपारी १ ते ३ या वेळेत भावार्थ रामायण व नंतर ३ ते ४ दरम्यान ज्ञानेश्वरी प्रवचण होईल. दुपारी ४ ते ५ या वेळेत हरिपाठ होईल. ५ ते ९ ही भोजनाची वेळ असून ९ ते ११ या वेळेत राज्यातील मान्यवर किर्तनकारांची किर्तन सेवा होणार आहे. रात्री ११ ते पहाटे ४ या वेळेत हरिजागर होईल. या हरिनाम सप्ताहात २६ रोजी प्रल्हाद महाराज कोतनकर यांचे प्रवचण तर ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचे किर्तन होणार आहे. २७ रोजी आण्णासाहेब महाराज शेळके यांचे प्रवचन व उत्तरेश्वर महाराज कोल्हारवाडी यांचे किर्तन होईल. २८ रोजी मोहन महाराज खरमाटे यांची प्रवचन सेवा व लक्ष्मण महाराज मेंगडे किर्तन, २९ रोजी संदिप महाराज जोशी यांचे प्रवचन व इंद्रजीत महाराज रसाळ यांचे किर्तन होईल. ३० रोजी पांडुरंग महाराज रांजवण यांचे प्रवचन व शुभम महाराज गडकर यांचे किर्तन होईल. १ मे रोजी काशिनाथ महाराज रांजवण यांची प्रवचन सेवा होवून पांडुरंग महाराज उगले यांचे किर्तन होईल. २ मे रोजी सखाराम महाराज जाधव यांची प्रवचन सेवा होणार असून रात्री संतोष महाराज अडावणे यांची किर्तन सेवा होईल. अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेप्रसंगी ३ मे रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत उमेश महाराज दशरथे यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होवून भाविकांना महाप्रसादाचा लाभ दिला जाणार आहे. दरम्यान रात्री ९ ते ११ या वेळेत शिवगिरी बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त पांडुरंग महाराज गिरी (वावीकर) यांचे सुश्राव्य किर्तन होवून नंतर शिवगिरी बाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक व नंतर महाआरती होवून कार्यक्रमाची सांगता होईल. ३ मे रोजी रात्री ११ ते २ या वेळेत महादेव महाराज पळस देवकर यांचा भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी श्री क्षेत्र कोल्हारवाडी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे कार्य प्रेरणादायी– नंदकुमार ठाकूर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रा मध्ये प्रत्यक्ष सहकुटुंब येऊन ज्या व्यक्तींना कोणी नाही अशा बेघर व्यक्तीं समवेत आपला वाढदिवस साजरा करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. बीड येथील नवी भाजी मंडई मध्ये जिव्हाळा बेघर निवारा केंद्र हे ज्यांना आपल्या हक्काचे घर नाही, रक्तातल्या नात्यांनी बेसहारा केले अशा अनाथ व्यक्तींना या केंद्रामध्ये निवारा देऊन त्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठी बेघर निवारा केंद्राची टीम अविरतपणे कार्य करते. निवारा केंद्रातील व्यवस्थापक राजु वंजारे, संचालक अभिजीत वैद्य, यश वंजारे, छाया सरोदे यांचे निस्वार्थ कार्य पाहून बीडच्या पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर देखील प्रभावीत झाले त्यांनी स्वतःहून कोणतीही पूर्वकल्पना न देता आपला वाढदिवस अचानक जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात सपत्नीक सकाळी बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांना फळे वाटून आणि मिष्ठान्न देऊन साजरा केला.




यावेळी मनोगत व्यक्त करताना ठाकुर म्हणाले की पोलीस खात्याला प्रेरणादायी ठरेल असे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र एक प्रकारे पूरक असे सामाजिक कार्य करत असून त्याबद्दल जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील व्यवस्थापक, कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले. स्वतःचा वाढदिवस असताना देखील पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी जिव्हाळा बेगर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांना नुकताच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मिळाल्या बद्दल पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला. तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या बाजूला सुरू असलेल्या महिला निवारा केंद्राची पाहणी करून समाधान व्यक्त केले. समाजकार्यासाठी नोकरी सोडून व्यवस्थापक राजु वंजारे यांनी मागील काही वर्षापासून बीड येथे जिव्हाळा बेगर निवारा केंद्राच्या माध्यमातून ज्या लोकांना घर नाही, जे रस्त्यावर फिरून उदरनिर्वाह करतात त्यांना निवाराकेंद्रात आणून जगण्याची नवी उमेद देण्याचे अनोखे कार्य निस्वार्थ भावनेने केले या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने प्रतिष्ठित असलेल्या राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्कार देऊन वंजारे यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी राजु वंजारे म्हणाले की जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे कार्य पाहण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज येथे उपस्थित आहेत. ही आपल्यासाठी अतिशय आनंददायक बाब असून ठाकूर साहेबांनी पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप विविध सामाजिक कार्याला अधिकाधिक बळ देणारी ठरेल, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या विविध सामाजिक उपक्रमास पोलिस विभाग बीड, बीड नगरपालिका मुख्याधिकारी, प्रशासनाचे वेळोवेळी विशेष सहकार्य लाभत असते तसेच राज्य शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराबद्दल बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी केलेला सत्कार नविन उर्जा प्राप्त करून देणारा असल्याचे ते याप्रसंगी म्हणाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजीत वैद्य सर तर उपस्थित यांचे आभार यश वंजारे यांनी मानले.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे सहा विद्यार्थी आर्मीमध्ये भरती



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सहा विद्यार्थी एकाच वेळी अग्निवीर माध्यमातून आर्मीमध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये

सोनपिर उत्तरेश्वर गोविंद,माऊली काचगुंडे, राम लांब, नामदेव कुंडकर,नारायण रुचके या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हे सर्व विद्यार्थी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थी आहेत. महाविद्यालयातील करियर कट्टा विभागाचे हे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले आहे. या विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल, यशाबद्दल प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य रमेश शिंदे, गुणवत्ता हमी विभाग प्रमुख डॉ मुकुंद राजपंखे, स्पर्धा परीक्षा, करियर कट्टा विभाग प्रमुख डॉ. दिलीप भिसे, एनसीसी विभाग प्रमुख प्रा. रोहीत पाटील इतर सर्व प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय कर्मचारी यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बीड शहरात पंकजाताईंच्या प्रचाराचा झंझावात

## जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंचा डोअर टू डोअर प्रचार





**बीड | प्रतिनिधी**

३९- बीड लोकसभा निवडणूक भाजपा महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वात बीड शहरातील जिजामाता चौक, जवाहर कॉलनी, शिक्षक कॉलनी, बसस्थानकच्या मागील परिसरात पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह प्रचार रॅली काढून डोअर टू डोअर प्रचार करण्यात आला. या प्रचार रॅलीत जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिप सदस्य अशोक लोढा, विक्रांत हजारी, जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांत फड, ओमप्रकाश गिरी, भूषण पवार, दादासाहेब ननावरे, लालासाहेब पन्हाळे, बालाजी पवार, बद्रीनाथ जटाळ, राजू शहाणे, केशव बडे, लालासाहेब पन्हाळे, ॲड संगीता धसे, मीराताई गांधले, डॉ जयश्रीताई मुंडे, छायाताई मिसाळ, लताताई राऊत, उज्वल कोटेजा यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संखेने सहभागी झाले होते.

बीड लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू असून , पंकजाताई यांना निवडणून आणण्यासाठी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई,रासप, मनसे सर्व घटक पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते जोमाने कामाला लागले. डोअर टू डोअर प्रचार करून, पूर्ण मतदार संघ पिंजून काढण्याचा छंद कार्यकर्त्यांनी हाती घेतला असून आज बीड शहरात डोअर टू डोअर प्रचाराचा शुभारंभ जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सुरु केला आहे. थेट मतदारांशी संवाद साधून पंकजाताईंच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहचवली जात आहे. या डोअर टू डोअर रॅलीला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. नरेंद्र मोदी यांच्या कामाविषयी मतदार बांधव खुश आहेत. त्याच्या कर्तुत्वाचा अभिमान आहे. पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्याची तीव्र इच्छा नागरिकांची असल्याने कमळ चिन्हावर मतदान करून पंकजाताईंना प्रचंड मतांनी विजय करण्याचा विश्वास मतदार बांधव देत आहेत.

# पारधी समाजातील १५ जणांनी पहिल्यांदाच केले मतदान



**पूर्णा । प्रतिनिधी**

शहरातील क्रांतीनगरात रहिवाशी झालेल्या भटके विमुक्त पारधी समाजातील १५ जणांना भारतीय नागरीकत्व मिळाले आहे. त्यामुळे त्यांनी प्रथमच शुक्रवारी (दि.२६) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील बुथवर परभणी लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावला. यात ९ महिला आणि ६ पुरुषाचा समावेश होता. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर आनंदोत्सव दिसून आला.

भटके विमुक्त पारधी जमातीतील सीता धर्मराज भोसले, धर्मराज यंकप्पा भोसले, टोपक्या गंगाप्पा भोसले, श्रीदेवी बसराज पवार, रेणुका बसराज पवार, यंकप्पा गंगप्पा भोसले, भागम्मा यंकप्पा भोसले, गंगाबाई शंय्यम पवार, शंकाई अजय पवार, शेषकला शंकर भोसले, शंकर परसराम भोसले, सुशिला श्याम पवार, श्याम दशरथ पवार यांनी मतदानाचा प्रथमच हक्क बजावला. भटके विमुक्त पारधी जमातीचे लोक टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करत पूर्णा शहरात मागील १४ वर्षांपासून वास्तव्यास होते. परंतु, त्यांना कोणत्याही मुलभूत गरज सुविधा पान ३ वर

# कुणब्याच्या पोराचे जातीचे प्रमाणपत्र सभेत दाखविण्यापेक्षा विकास कामाची कागदपत्रे दाखवावीत

## इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंचे खुले आव्हान



**बीड | प्रतिनिधी**

मला मिळालेले कुणबी जातीचे प्रमाणपत्र हे मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्याचे यश आहे. पालकमंत्र्यांनी कुणब्याच्या पोराचे जातीचे प्रमाणपत्र भर सभेत दाखवून अपमान केला. त्यांनी स्वतः व दोन्ही ताईंनी केलेल्या विकास कामाचे कागदपत्रे दाखवली पाहिजेत. असे खुले आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केली आहे.

बीड लोकसभेच्या निवडणुकीसाठी भाजप व महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या जाहीर सभेत बोलताना पालकमंत्र्यांनी शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांचे कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र भर सभेत दाखवून त्यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली होती. या टिकेबद्दल प्रसार माध्यमांशी बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, या राज्याचे कृषिमंत्री व जिल्ह्याच्या पालकमंत्री महोदयांनी भर सभेत कुणबी जातीचे प्रमाणपत्र दाखवून मराठा व कुणबी मराठ्यांचा अपमान केलेला आहे. मला मिळालेले कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र हे मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्याचे यश आहे. आजी - माजी पालकमंत्र्यांनी माझे कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र सभेत दाखविण्याऐवजी त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांची कागदपत्रे दाखवायला हवी होती. मी जन्माने कुणबी मराठा आहे, मात्र खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत मी इतर मागासवर्गीय प्रवर्गातून एका माळी समाजाच्या व्यक्तीला निवडून आणून न्याय दिला. कुणबी जातीच्या प्रमाणपत्रावरून राजकारण करणे हे चुकीचे आहे. असे ही ते म्हणाले.

बीड लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उमेदवारांवर टीकेची झोड उठवून आरोप - प्रत्यारोपणाने वातावरण तापले आहे. जनतेचे विकास कामाच्या मुद्द्यावरील लक्ष विचलित पान ३ वर

# गुवाहाटीच्या गद्दारांना राहुल गांधींवर बोलण्याचा अधिकार नाही- नाना पटोले यांची टीका

**मुंबई | प्रतिनिधी**



लोकसभेच्या निवडणुकीचा दुसराच टप्पा होत असताना भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्रपक्षांची घाबरगुंडी उडाली आहे. पराभवाच्या भितीने ते सैरभैर झाले असून काँग्रेस व इंडिया आघाडीवर खालच्या पातळीवर येऊन टीका करत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे भाजपाच्या मेहरबानीवर बसवलेले मुख्यमंत्री आहेत. भाजपा जेवढी चावी देती ते तेवढेच बोलू शकतात परंतु काँग्रेस पक्ष व राहुल गांधी यांच्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी मर्यादा सोडू नये. गुवाहाटीच्या गद्दारांना राहुल गांधींवर बोलण्याचा अधिकार नाही. राहुलजींवर टीका केल्याने एकनाथ शिंदेंच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही, असे सडेतोड उत्तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले.

राहुल गांधी यांच्या वरील एकनाथ शिंदे यांच्या विधानाचा समाचार घेताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राहुल गांधी यांनी पदयात्रा काढून संपूर्ण भारत देश पिंजून काढला आहे. कन्याकुमारी ते काश्मीर ४ हजार किलोमीटरची पदयात्रा काढली. सर्व समाजाच्या लोकांच्या वेदना जाणून घेतल्या, त्यानंतर मणिपूर ते मुंबई ६७०० किमी ची भारत जोडो न्याय यात्रा काढली. राहुल गांधी यांनी ऊन, वारा, पावसाची तमा बाळगली नाही, सतत चालत राहिले ते केवळ देशातील जनतेसाठी, त्यामुळे गरम झाले की राहुल गांधी परदेशात जातात असे बाष्कळ विधान करुन एकनाथ शिंदे यांनी अकलेचे तारे तोडले आहेत. गद्दारी करुन सत्ता मिळवणाऱ्या भाजपच्या मिंध्यांना गांधी कुटुंबाचा त्याग, बलिदान व राहुल गांधी काय कळणार? असा सवालही यावेळी केला. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या मदतीने बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडून गद्दारी केली. भाजपाच्या मदतीने सुरत व तेथून गुवाहाटीला जावून महाविकास आघाडीचे सरकार पाडले. ईडी कारवाईच्या भितीने गद्दारी करून पक्ष चोरणाऱ्यांनी काँग्रेस व राहुल गांधी यांच्याबद्दल बोलू नये. भाजपाच्या वळचणीला गेलेल्या एकनाथ शिंदे यांनी काहीही केले तरी त्यांच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का कधीही पुसला जाणार नाही अशी टीकाही यावेळी केली. नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधीवर केलेल्या टिकेचाही पटोले यांनी समाचार घेतला. बावनकुळे यांना त्यांच्या पक्षातच कोणी विचारत नाही. ते दररोज फक्त विरोधी पक्षांच्या नेत्यांवर गरळ ओकत असतात, देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना तेवढेच काम दिलेले आहे. राहुल गांधी यांच्यावर बोलण्याएवढे बावनकुळे यांची उंची नाही. राहुल गांधी यांच्याबद्दल बोलण्याआधी बावनकुळे यांनी त्यांच्या पक्षाचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदींनी विरोध पक्षांचे नेते, महिला यांच्याबद्दल कसे बोलावे याचे धडे द्यावेत मग दुसऱ्यांना शिकवावे, असा खोचक सल्लाही यावेळी दिला.

# माजीमंत्री सुरेश नवलेंनी मुख्यमंत्र्यांना ठोकला रामराम

सभाजीनगर । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासुन शिवसेना पक्षामधील शिवसैनिक, शिवसेना नेते आणि उपनेते यांच्या मनातील खदखद आणि नाराजी मी प्रातिनिधीक स्वरुपामध्ये व्यक्त केलेली आहे. ज्यांनी आपले राजकिय जिवन पणाला लावून मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची सोबत केली. त्यांना मुख्यनेता मानुन नेतृत्व स्वीकारले पण दूर्दैवाने लोकसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांना उमेदवारीही मिळवता आलेली नाही.



एका अर्थाने त्यांचे राजकिय बळी गेलेले आहेत, मित्रपक्षाच्या राजकिय दबावामुळेच त्यांचे बळी गेले अशी भावना माझ्या सहित शिवसैनिकांची झालेली आहे.

मा. मनोज जरांगे पाटील यांची फसवणुक असो किंवा परशुराम आर्थक महामंडळ प्रश्नी ब्राम्हण बांधवांची फसवणुक असो किंवा धनगर बांधवाना झुलवत ठेवणे असो याच्या केंद्रस्थानी कोणता पक्ष आहे हे महाराष्ट्र जाणुन आहे.

'भाजपाचा एकच मंत्र, दबाव तंत्र'', याचा अनुभव शिवसेना घेत आहे. हेच शल्य शिवसैनिकासाठी बोचणारे आहे.

शिवसैनिकांच्या खांद्यावर बसुनच भाजपा सत्तेची फळे चाखत आहे. याचा विसर मात्र त्यांना पडलेला आहे. मा. एकनाथ शिंदेजी यांनी उठाव केला म्हणुन सत्तेच्या पालखीत बसण्याचा मान भाजपाला मिळाला. अभूतपूर्व असे सत्तांतर घडले. चमत्कारीक सत्तांतराचे सर्वेसर्वा फक्त एकनाथ शिंदेजी हेच आहेत हे मित्र पक्षांनी विसरु नये.

आता राहतो प्रश्न शिवसेनेचा. शिवसेनेमध्ये चर्चा आणि संवाद यांना पूर्ण विराम दिलेला दिसतोय. पक्षा मधील वरीष्ठ पातळीवरील नेतृत्व भावनांची दखल पान ३ वर

# करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटलांचा पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**करमाळा | प्रतिनिधी**

माढा लोकसभा मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून नाट्यमय राजकीय घडामोडी घडत आहेत. मोहिते पाटील कुटुंबाने भाजपविरोधात बंड करत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर पवार यांनी माढ्यातून धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. मोहिते पाटलांचा विजय सुकर व्हावा यासाठी पवारांकडून नवनवे डावपेच आखले जात आहेत.

लोकसभेसाठी इच्छुक असलेल्या अभयिंसह जगताप आणि शेकापचे अनिकेत देशमुख यांचे बंड थंड केल्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे करमाळ्यातील माजी आमदार नारायण पाटील यांना आपल्याकडे खेचण्यात शरद पवारांना यश मिळाले आहे. नारायण पाटील यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. करमाळ्याचे विद्यमान आमदार संजय शिंदे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीसोबत आहेत. त्यामुळे नारायण पाटील यांनी शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचं दिसत आहे. धैर्यशील मोहिते पाटलांच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातील प्रवेश सोहळ्यावेळीही नारायण पाटील उपस्थित होते. त्यामुळे तेही पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करतील, असे सांगितले जात होते. अखेर या चर्चेवर आज शिक्कामोर्तब झाले असून पाटील यांनी हाती तुतारी घेतली आहे.

# पंकजाताईंचा राज्यातील नेतृत्वावर भरोसा नाही का?

## बजरंग सोनवणेंचा मुंडे - फडणवीसांच्या पक्षांतर्गत कुरघोडीवर निशाणा



बीड / शिरूर / राक्षसभुवन

भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या आपल्या केंद्रातून उमेदवारी जाहीर झाल्याचे सांगत आहेत. त्यांचा राज्याच्या नेतृत्वावर भरोसा नाही का ? अशी मिश्किल टिप्पणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी करीत मुंडे - फडणवीसांच्या पक्षांतर्गत कुरघोडीवर सोनवणेंनी निशाणा साधला. ते राक्षसभूवन (ता. शिरूर कासार ) येथे बोलत होते.

बीड लोकसभा निवडणुकीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी शिरूर तालुक्यातील वैद्यकीन्ही, भिल्लारवडी, जेधेवाडी, जाटनांदूर, चावरवाडी, वडाळी, सवासवाडी, सिंदफणा, गोमाळवाडा, रुपुर, कोळवाडी, शिरूर कासार, कान्होबाचीवाडी, झापेवाडी, राक्षसभुवन येथे मतदारांच्या गाठीभेटी घेत संवाद साधला.

यावेळी बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, प्रतिस्पर्धी भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या त्यांची उमेदवारी ही भाजपच्या केंद्रीय कार्यकारिणीने जाहीर केल्याचे जनतेला सांगत आहेत. मात्र त्या भाजपच्या राष्ट्रीय चिटणीस असताना त्यांचा कदाचित राज्यातील भाजपच्या नेतृत्वावर विश्वास नसेल. म्हणूनच त्यांची भाजपच्या केंद्रीय कार्यकारिणीतून उमेदवारी जाहीर झाली असावी. जर त्यांची उमेदवारी ही केंद्रीय समितीने जाहीर केली पान ३ वर

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचार फेरीचा भव्य शुभारंभ

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

राज्यातील महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचा धर्म पाळत अंबाजोगाई शहरातील आदर्श कॉलनी परिसरातील कपिल गणेश मंदिरात मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत वन टू वन प्रचारासहलगीच्या निनादात जोमाने सुरुवात केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या समवेत माजी आमदार संजय दौंड, बबनभैय्या लोमटे, माजी नगरसेवक जीवनदादा कऱ्हाड, कमलाकर कोपले, मनोज लखेरा,अनंत लोमटे, दिलीप काळे,तानाजी देशमुख, दिनेश भराडीया, खालेद चाऊस, दुर्गादास देशपांडे, शैलेंद्र कन्नडकर, महादेव आदमाणे, अनिलराव गौंड,अकबर पठाण, प्रवीण जायभाय,विकास बाभूळगावकर, उमाआप्पा शेटे, माजी नगरसेविका निलावतीताई कऱ्हाड, सुनील व्यवहारे, सुलोचनाताई बाभूळगावकर,राजू गिरी, कौस्तुभ कोदरकर, संजय कुलकर्णी, लताबाई लाड, तिडके मॅडम, ठोंबरे मॅडम, माले मॅडम, अंगद जाधव, माणिक वडवनकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात बीड लोकसभेच्या



उमेदवार पंकजा मुंडे यांचा प्रचार अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शहरात देखील राजकिशोर मोदी यांच्या कडून जोमात प्रत्यक्ष वन टू वन प्रचारास सुरुवात झाली. परिसरातील नागरिकांनी देखील यावेळी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिल्याचे चित्र पहावयास मिळाले. अंबाजोगाई शहर म्हणले की राजकिशोर मोदी असेच समीकरण शहरवासीयांच्या कडून मागील तीस वर्षांपासून पहावयास मिळते आहे. याचाच परिचय आजच्या प्रचार रॅलीतून दिसून आला. राजकिशोर मोदी हे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून गेली तीस ते पस्तीस वर्षापासून सेवा करत आहेत. अंबाजोगाई करांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे काम राजकिशोर मोदी यांनी अविरतपणे केले आहे. म्हणूनच आजही राजकिशोर मोदी यांच्या नावाची क्रेझ जेष्ठ नागरिकांपासून बच्चेकंपनी मधून स्पष्टपणे पहावयास व अनुभवयास मिळते आहे.

या प्रचारादरम्यान पंकजा मुंडे यांनी यापूर्वी केलेल्या कामांची आठवण करून देताना तसेच याअगोदरची अपूर्ण राहिलेली सर्व कामे केंद्र सरकारच्या मदतीने पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी नागरिकांना दिले. यासाठी आपण सर्वांनी मिळून पंकजाताई मुंडे यांना आपले अनमोल असे मतदान रुपी आशीर्वाद देऊन प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठीचा संकल्प करून त्यांना संसदेत पाठवण्यासाठी मेहनत करू असे आवाहन देखील मतदारांना या प्रचार फेरीदरम्यान राजकिशोर मोदी यांनी केले.

या प्रचारफेरीत विष्णू पांचाळ, गणेश मसने, सूनिल वाघाळकर, बबन पानकोळी, चंद्रकांत महामुनी, सुधाकर टेकाळे, जावेद गवळी,विशाल पोटभरे, सचिन जाधव, आकाश कऱ्हाड,महेबूब गवळी, रोशन लाड,महेश कदम,सुगत सरवदे, शरद काळे,अमोल मिसाळ, सनी लखेरा यांच्यासह शेकडो राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा चे कार्यकर्ते सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान महायुतीचा विजय असो, ना. अजितदादा पवार, ना. धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, राजकिशोर मोदी यांच्या घोषणाने परिसर दुमदुमून गेला होता.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे महापालिकेच्या वतीने भिडे पूल परिसरात ‘नदी स्वच्छता मोहिम’

पुणे: महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २६) सकाळी ७ ते ९ या वेळेत भिडे पूल नदीकाठ परिसरात नदी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या २०२४ च्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत जागतिक वसुंधरा दिनानिमित्त २२ एप्रिल ते २८ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यात स्वच्छता अभियान, सिंगल युज प्लास्टिकबंदी अंमलबजावणीबाबत जनजागृती व कारवाई, ई-कचरा संकलन मोहीम या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगानेच शुक्रवारी सकाळी ’नदी स्वच्छता मोहिमेचे’ आयोजन करण्यात आले होते. या अभियानात विविध क्षेत्रातील २५० व्यक्तींनी सहभाग नोंदवला आणि ३७० किलो सुका कचरा संकलित करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.



यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. (इस्टेट), उपायुक्त संदीप कदम (घनकचरा व्यवस्थापन), उपायुक्त माधव जगताप (पर्यावरण विभाग), सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. केतकी घाटगे (घनकचरा व्यवस्थापन), सहाय्यक आयुक्त रवी खंदारे (शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय), पर्यावरण अधिकारी मंगेश दिघे, ब्रँड ॲम्बॅसीडर रुपाली मगर, विक्रांत सिंग, आम्रपाली चव्हाण, इमामुद्दिन इनामदार यांच्यासोबतच इतर अधिकारी आणि कर्मचारीवर्ग उपस्थित होते. तसेच मोहल्ला कमिटीचे सदस्य, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी देखील आपला सहभाग नोंदविला.

तसेच शहरातील काही महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी देखील नदी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. यात एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, कै. बंडोजी खंडोजी चव्हाण महाविद्यालय, कावेरी इंटरनॅशनल स्कूल, हिराभाई व्ही. देसाई कॉलेज, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक आणि स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था, आदर पूनावाला क्लिनसिटी इनिशिएटिव्ह या संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

या अभियानामध्ये पर्यावरणपूरक, जागतिक तापमानवाढ संबंधी व स्वच्छता विषयक गीत सादर करण्यात आले. तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी.यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सर्वांना पर्यावरणपूरक सवयी जोपासण्याविषयी आवाहन केले. तसेच सिंगल युज प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती करण्यासाठी अक्षरस्पर्श मतिमंद विद्यालय/कार्यशाळा यांच्यामार्फत अपंग, मतिमंद व निराधार विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे सहभागींना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागींनी माझी वसुंधरा व मतदार जागृती शपथ घेतली आणि कार्यक्रम संपन्न झाला.

# ‘त्या’ हल्लेखोरास पाच दिवस पोलिस कोठडी

**मोरगाव । प्रतिनिधी**

मोरगाव महावितरण कार्यालयातील महिला कर्मचारी रिंकू बनसोडे यांच्यावर बुधवारी (दि. २४) एका माथेफिरू ग्राहकाने कोयत्याने हल्ला करीत त्यांचा खून केला. या हल्लेखोराचे नाव अभिजित पोटे असे असून त्याला पोलिसांनी बुधवारीच अटक केली होती. पोटे याला पोलिसांनी न्यायालयात उपस्थित केले असता त्याला पाच दिवसांची (दि. ३० एप्रिलपर्यंत) पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती सुपेचे पोलिस निरीक्षक वसंत वाघोले यांनी दिली.

मोरगाव येथील महावितरण कार्यालय शासकीय विश्रामगृहानजीक आहे. येथे बुधवारी महिला कर्मचारी रिंकू बनसोडे यांच्यावर अभिजित पोटे याने कोयत्याने हल्ला करून त्यांचा खून केला. यामुळे मोरगाव येथील विद्युत कर्मचारी भीतीच्या सावटाखाली आहेत.

दरम्यान हे कार्यालय सुपा पोलिसांनी सील केले आहे. या कार्यालयातील सुमारे ११ कर्मचाऱ्यांची तात्पुरती व्यवस्था कार्यालयाच्या बाजूलाच असलेल्या ११ केव्हीच्या ऑपरेटर कार्यालयामध्ये करण्यात आली आहे.

ही घटना अत्यंत दुर्दैवी, वेदनादायी आहे. कर्मचार्यांवर होणार्या अशा हल्ल्यामुळे जनसेवा कशी करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे. रात्रीच्या किंवा अडचणीच्या वेळी विद्युतपुरवठा खंडित




झाल्यास ताबडतोब आमच्यामार्फत हा पुरवठा सुरळीत केला जातो. मात्र अशा घटना घडत असल्यास आम्हाला अत्यंत वेदना होत आहेत. रिंकू बनसोडे या मनमिळाऊ होत्या. कोणाचे कधी मन दुखावेल, असे त्यांचे विचार किंवा वागणे नव्हते. त्यांच्याबाबत अशी घटना घडल्याने आम्हा सर्वांना अत्यंत वेदना होत असल्याचे सांगत कर्मचार्यांनी त्यांच्या निधनाबाबत हळहळ व्यक्त केली. खून झालेल्या महिला कर्मचारी रिंकू बनसोडे या मूळ लातूर येथील आहेत. त्यामुळे त्यांचा मृतदेह लातूर येथे नेण्यात आला. सोमेश्वरचे उपकार्यकारी अभियंता संतोष चव्हाण हे रिंकू बससोडे यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहण्यासाठी लातूर येथे रवाना झाले आहेत.

# ‘एमआयटी एडीटी’चा ‘विशे’ कॉम्पोनंटशी करार

**पुणे । प्रतिनिधी**

एमआयटी आर्ट डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेचा इलेक्ट्रॉनिक अँड कम्युनिकेशन विभाग व ’विशे’ कॉम्पोनंट इंडिया प्रा. लिमिटेड लोणी- काळभोर पुणे, यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. ’विशे’ कॉम्पोनंट या इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीतर्फे आता विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच, प्रशिक्षण तसेच या इंटर्नशिप आदींसाठी मार्गदर्शन लाभणार आहे.



या सामंजस्य कराराप्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, ’विशे’ कॉम्पोनंटचे मुख्य संचालक आर.आनंथक्रिश्नन, अभिजित पिंपळे, नॅथानिअल मनिकम, स्कुल ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ.विरेंद्र शेटे, अधिष्ठाता डॉ.सुदर्शन सानप, विभागप्रमुख डॉ.शुभांगी जोशी, डॉ.शंकर गंभिरे आदी या प्रसंगी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आनंथक्रिश्नन यांनी, या सामंज्यस्य करारासाठी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड यांचे आभार मानले. ते यावेळी म्हणाले, आम्ही इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील सर्व मोठ्या कंपन्यांना सेवा पुरवतो. त्यात विविध संशोधन व नाविण्यपूर्ण कामासाठी आम्हाला प्रतिभाशाली विद्यार्थ्यांची कायमच आवश्यकता असते. त्यामुळे या कराराचा आम्हाला व संशोधनाला मोठा फायदा होणार आहे.

याप्रसंगी बोलताना, प्रा.डॉ.कराड म्हणाल्या की, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग एक अत्यंत चांगल्या प्रकारे विद्यार्थीकेंद्री काम करणारा आमचा विभाग असून सध्या आमचा टाटा मोटर्स, जॉन डिअर सारख्या कंपन्यांशी सामंजस्य करार आहे. त्यात आता ’विशे’ कॉम्पोनंटची भर पडल्याचा आनंदच आहे. तरी या करारातून आमच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या तसेच, संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले.

# माजी साखर आयुक्त अरविंद रेड्डी यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे माजी साखर आयुक्त अरविंद रेड्डी (वय ८४ ) यांचे शुक्रवारी (दि.२६) दुपारी बारा वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. पुण्यातील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तेथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



त्यांच्या मागे आनंद आणि अमर ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

रेड्डी यांनी जिल्हाधिकारी म्हणून धुळे, ठाणे येथे काम केले होते. राज्याच्या साखर आयुक्तपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यांच्या साखर आयुक्त पदाच्या कारकिर्दीत सध्याच्या साखर संकुल वास्तूचे भूमिपूजन झाले आणि बांधकाम पूर्ण होऊन या इमारतीचे उद्घाटनही त्यांच्याच कारकिर्दीत १ जानेवारी २००१ रोजी झाले. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत ए. आर. अंतुले यांचे खासगी सचिव म्हणूनही काम पाहिले. शासकीय सेवेतील निवृत्तीनंतरही ते दीर्घकाळ मुंबई मॅरेथॉनशी संलग्न होते.

# माजी सभापतींच्या मुलावर कोयत्याने प्राणघातक हल्ला

**सासवड । प्रतिनिधी**

जुन्या जमिनीच्या वादातून माजी सभापती दादासाहेब घाटे यांचा मुलगा अजय दादासाहेब घाटे (रा. चिदानंद सोसायटी गोकुळनगर, कात्रज) याच्यावर कुटुंबातील दोघांनी प्राणघातक हल्ला केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी सासवड पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. मंगल दादासाहेब घाटे यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,) आस्करवाडी (ता. पुरंदर) येथे काळुबाई मंदिरात आरती झाल्यानंतर पूजा करणारे पुजारी यांच्या अंगात येते, ते पाहण्यासाठी अजय घाटे व फिर्यादी मंगल घाटे मंदिरात बसले होते.



या वेळी जुन्या जमिनीच्या वादातून रायबा धोंडिबा घाटे (५१) आणि संकेत रायबा घाटे (वय २५, दोघेही रा. पठारवाडी, ता. पुरंदर) यांनी दोन पिशव्यांमध्ये दोन कोयते आणून अजय घाटेला पाठीमागून कोयत्याने डोक्यात मारून गंभीर जखमी केले. दोन्ही आरोपींना सासवड पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला. दोघांनाही सासवड न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली, अशी माहिती पोलिस निरीक्षक ऋषीकेश अधिकारी यांनी दिली. याबाबत सहायक पोलिस निरीक्षक बाजीराव ढेकळे या घटनेचा तपास करीत आहेत.

# अवकाळीची जोरदार हजेरी; वादळी वार्याने ऊस पिके भुईसपाट

**मांडवगण फराटा । प्रतिनिधी**

धुमाळवाडी (ता. शिरूर) येथे अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून, वादळी वार्याने ऊस पिके भुईसपाट झाली आहेत. मागील आठवडाभरात शिरूर तालुक्यात तापमानाचा उच्चांक नोंदवला असून उन्हाने जिवाची काहिली होत आहे. बुधवारी (दि. २४) सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास अचानक ढग दाटून आले. त्यानंतर वादळी वार्याला सुरुवात झाली.

यानंतर सुमारे एक ते दीड तास जोरदार पावसाने हजेरी लावली. या वादळात शिरसगाव काटा, धुमाळवाडी परिसरात ऊस पीक भुईसपाट झाले, तर मका, कडवळ या पिकांना फटका बसला. कांदा काढणीला आला असताना अनेकांचा कांदा जागीच भिजला तर फळपिकांचे मोठे नुकसान झाले. या वादळी वार्यात स्थानिक शेतकर्यांचे नुकसान झाले



असून त्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी शेतकर्यांनी केली आहे.

# आमच्या उज्वल भवितव्यासाठी तरी मतदान करा

## एन.ई.एम.एस.मधील विद्यार्थ्यांचे पालकांसह पुणेकरांना आवाहन; साईनाथ मंडळ ट्रस्ट व श्री शिवाजी मित्र मंडळातर्फे आयोजन

पुणे : ‘आम्ही मतदान करू शकत नाही; पण आमच्या उज्वल भवितव्यासाठी तुम्ही नक्की मतदान करा’ अशी आर्जवी विनंती न्यू इंग्लिश मिडिअम शाळेतील (एन.ई.एम.एस. शनिवार पेठ) विद्यार्थ्यांनी पालकांसह पुणेकरांना आज (दि. २६) केली. मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीही केले.

गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदानाचा घसरता टक्का दिसून आलेला आहे. निवडणुकीतील मतदानाचा टक्का वाढावा यासाठी शासकीय यंत्रणा त्यांच्या पातळीवर प्रयत्न करीत आहेत. सामाजिक बांधिलकी जपत साईनाथ मंडळ ट्रस्ट, बुधवार पेठ, श्री शिवाजी मित्र मंडळ, भवानी पेठ आणि न्यू इंग्लिश मिडिअम शाळेतील प्राथमिक व माध्यमिक वर्गातील सुमारे चारशे विद्यार्थ्यांनी मतदानाचे आवाहन करीत जनजागृती केली. कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन साईनाथ मंडळ ट्रस्टचे




अध्यक्ष पियूष शहा यांचे होते. शाई लावलेल्या बोटासह ‘व्होट १०० पर्सेंट’ दर्शवित काढलेल्या भव्य रांगोळी भोवती उभे राहून विद्यार्थी, पालक प्रतिनिधी व शिक्षकांनी ‘शंभर टक्के मतदान करूया’, ‘व्होट फॉर अवर फ्युचर’, ‘घरा बाहेर पडू, मतदानाचा हक्क बजावू’ अशा घोषणा दिल्या. मतदानाच्या दिवशी सुटी जाहीर केलेली असली तरी आधी मतदानाचा हक्क बजावा मगच सुटीचा आनंद लूटा असे आवाहनही विद्यार्थ्यांनी केले. आदिती गोखले आणि अवनी थोरात या विद्यार्थी प्रतिनिधींनी ‘आम्ही लहान मुले मतदान करू शकत नाही; परंतु पालकांनी आपला मतदानाचा हक्क बजावत आमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी योग्य व्यक्तीला मत द्यावे’ असे मतदानाविषयी जनजागृती करणारे मनोगत व्यक्त केले. मतदानासाठी पालकांना प्रवृत्त करावे, असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापक हेमांगी देशमुख, प्रितम जोशी, शिल्पा कुलकर्णी यांनी मनोगतात केले.

पियूष शहा प्रास्ताविकात म्हणाले, मागील दोन निवडणुकांमध्ये पुण्याचा मतदानाचा टक्का घसरला आहे. त्यामुळे मुलांनी आपल्या पालकांना आणि परिसरातील नागरिकांना दि. १३ मे रोजी मतदान करण्यासाठी घरोघरी जाऊन प्रवृत्त करावे. मुले ज्या-ज्या भागात राहातात त्या-त्या परिसरात मुलांनी जनजागृती करत मतदानाचे महत्त्व पटवून द्यावे. ज्या योगे मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल.

श्री शिवाजी मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद जाधव, गोविंदा वरदानी, नरेंद्र व्यास, ऋत्विक अदमुलवार, तसेच साईनाथ मंडळ ट्रस्टचे नरेंद्र व्यास, विक्रम गोगावले, गंधाली शहा उपस्थित होते. राष्ट्रीय कला अकादमीचे अमर लांडे आणि रोमा लांडे यांनी रंगावलीची रचना केली.

# पुणे विद्यापीठातील रिफ्रॅक्टरीत नित्कृष्ट जेवण; मनसेचे आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने शुक्रवारी सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठात तीव्र आंदोलन केले, रिफ्रॅक्टरीतील नित्कृष्ट जेवण प्रशासनातील अधिकाऱ्यांना चारले. रेफ्रॅक्टारी चालक, भोजन समिती अध्यक्ष व कॅन्टीन मॅनेजर यांना याप्रसंगी जाब विचारून जो पर्यन्त जेवणाचा दर्जा सुधारत नाही तसेच विद्यार्थांना पौष्टिक, पोटभर आणि दर्जेदार जेवण माफक दरात मिळणार नाही तो पर्यंत विद्यार्थी जे जेवण दररोज जेवतात तेच जेवण दररोज विद्यापीठ प्रशासनाला खायला घालण्याची आक्रमक भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने घेण्यात आली. यावेळी मनविसे पदाधिकाऱ्यांनी जेवणाची ताटे थेट कुलगुरूंच्या ऑफिस आवारात नेली आणि जबाबदार अधिकाऱ्यांना बोलावून विद्यार्थी खातात ते नित्कृष्ट जेवण संबंधितांना खायला घातले.

विद्यापीठ प्रशासन जेवणानावर लाखो रुपये खर्च करतात, विविध कार्यक्रमांसाठी १०००-१५०० रुपयांचे जेवण बाहेरून मागवण्यात येते परंतु विद्यार्थ्यांना मात्र त्यांच्या आरोग्याला त्रासदायक बेचव जेवण दररोज देण्यात येते. सुमारे पाच हजार विद्यार्थी दररोज याच रिफ्रॅक्टरी शेजारी शंकर महाराज मठातील मोफत अन्नछत्रातील खिचडी खातात परंतु रेफ्रॅक्टरी मध्ये फक्त २००-३०० विद्यार्थी च जेवतात , याचे कारण म्हणजे तेथील नित्कृष्ट , दर्जाहीन असे जेवण आहे. सुमारे ९८ % विद्यार्थी तिथे जेवत नाहीत आणि तेच विद्यार्थी रात्री उपाशी राहतात किंवा बाहेर खातात अशी विदारक परिस्थितीत विद्यापीठातील विद्यार्थी शिकत आहेत. याला जबाबदार असणाऱ्या सर्वांना मनविसे आपल्या पद्धतीने थाऱ्यावर आणणार आणि पुढील ७ दिवसात हक्काचे असे दर्जेदार, पौष्टिक पोटभर जेवण विद्यार्थांना मिळवून देणार आहे तो पर्यंत हे आंदोलनअमित ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू राहणार आहे.या प्रसंगी कॅन्टीन मध्ये मनविसे कार्यकर्त्यांनी व विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणबाजी करून विद्यापीठाचा निषेध केला आणि यापुढे जेवणाबाबत काहीही तक्रार असल्यास अथवा कॅन्टीन चालक, प्रशासनाकडून विद्यार्थ्यांवर दबाव येत असल्यास मनविसे कडे संपर्क साधण्यास कळविले.

अमित ठाकरे यांनी जो अभूतपूर्व मोर्चा विद्यापीठात काढला होता त्यावेळी विद्यापीठातील जेवणाच्या दर्जाबाबत कुलगुरूंकडे आवाज उठविला होता आणि विद्यार्थ्यांच्या हक्काचं जेवण दर्जेदार आणि पौष्टिक मिळण्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने आज आक्रमक आंदोलन करण्यात आले.

उप शहराध्यक्ष धनंजय दळवी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महा. राज्य कार्यकारणी सदस्य अभिषेक थिटे, विभाग अध्यक्ष आशुतोष माने, केतन डोंगरे विभाग सचिव सूरज पंडित, विभाग उपाध्यक्ष ऋषिकेश जगताप, निखिल राजपूत, प्रज्वल अडगळे, जय लायगुडे , प्रतीक अनगळ इत्यादी पदाधिकारी व विद्यापीठातील असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यात एक कोटी ३९ लाख टन ऊसगाळप

## गतवर्षापेक्षा पाच लाख टन अधिक ऊसगाळप

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यात यंदाच्या २०२३-२४ च्या हंगामात आत्तापर्यंत १४ साखर कारखान्यांनी सुमारे एक कोटी ३२ लाख १० हजार ५०० टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे. त्यातून १०.५६ टक्के सरासरी उतार्यानुसार एक कोटी ३९ लाख ५६ हजार ४५७ क्विंटलइतके साखर उत्पादन

हाती आले आहे. गतवर्षी एक कोटी २६ लाख ९१ हजार ६५८ टनाइतके ऊसगाळप पूर्ण झाले होते. याचा विचार करता सुमारे पाच लाख टनांनी अधिक ऊसगाळप यंदा झाले आहे. ऊसगाळप आणि साखर उत्पादनात बारामती ॲग्रो, दौंड शुगर हे दोन खासगी कारखाने अग्रस्थानी असून, ११.९६ टक्क्यांइतका सर्वाधिक उतारा घेत श्रीसोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने अव्वल स्थान मिळविले आहे.



हंगामअखेर कारखान्यांचे ऊसगाळप, साखर उत्पादनात किंचित वाढ होण्याची अपेक्षा असली, तरी सध्याची कारखान्यांची क्रमवारी कायम राहण्याची अपेक्षा आहे. कारण जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यांचा हंगाम संपुष्टात आला आहे. जिल्ह्यात सध्या श्रीसोमेश्वर आणि विघ्नहर या दोन सहकारी साखर कारखान्यांचा ऊसगाळप हंगाम सुरू आहे. आणखी आठवडाभर या कारखान्यांचा हंगाम सुरू राहण्याची अपेक्षा असल्याचे साखर आयुक्तालयातून सांगण्यात आले.

बारामती शुगरने २१ लाख ५४ हजार ७९४ टनाइतके सर्वाधिक ऊसगाळप केले आहे. तर ९.३३ टक्के उतार्यानुसार १९ लाख ८६ हजार ७२५ क्विंटल साखर उत्पादन मिळविले आहे. त्या खालोखाल ऊसगाळप दौंड शुगरने केले असून, ते १८ लाख एक हजार ८७७ टन आहे. त्यांनी ९.५७ टक्के उतार्यानुसार १७ लाख २६ हजार २०० क्विंटलइतके साखर उत्पादन तयार केले आहे. मात्र, ऊसगाळपात तिसर्या स्थानावर असलेल्या सोमेश्वरने १५ लाख २० हजार ४२५ टन ऊसगाळप पूर्ण केले असून, हा कारखाना अद्याप सुरू आहे. या कारखान्याने आत्तापर्यंत १८ लाख १९ हजार ६५० क्विंटलइतके साखर उत्पादन तयार केले आहे.